दैनिक

# समर्थ राजयोग

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

SAMARTH RAJYOG

वैभव विवेक स्वामी
सपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ५ वे | अंक -२८५ | बुधवार,दि.१८ जुन २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू | । पाने ४

Beed | Daily Marathi | Year-5th | Issue-285 | Wednesday, Dt.18 June 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

# बालविवाह तसेच ऊसतोड महिला कामगारांच्या प्रश्नाबाबत कठोर उपाय योजना करणार - जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन

**बेकायदेशीर सोनोग्राफी आणि गैरकृत्य करणाऱ्या सोनोग्राफी सेंटरवर धाडी टाकून दोषींवर थेट कारवाई होणार, प्रशासन ॲक्शन मोडवर !**

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील ऊसतोड महिला कामगारांच्या गर्भपिशवी काढण्याबाबतजी माहिती माध्यमांमध्ये आली आहे ती चुकीच्या पद्धतीने आली आहे.जिल्हा प्रशासन याबाबत अत्यंत संवेदनशील पद्धतीने उपाय योजना करीत आहे. तसेच जिल्ह्यातील बालविवाहाच्या समस्येवरही जनजागृतीच्या माध्यमातून आगामी काळात काम करण्यात येईल. बीड जिल्ह्यात जे बोगस सोनोग्राफी सेंटर आहेत आणि ज्या अधिकृत सोनोग्राफी सेंटरमध्ये गैर उद्योग सुरू आहेत अशा सर्व सोनोग्राफी सेंटरवर प्रशासन आता थेट धाडी टाकून कोणत्याही गुन्हेगारांना माफ करणार नाही. जे दोषी असतील त्यांच्यावर कायदेशीर कठोर कारवी कारवाई केली जाईल असे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी पत्रकार परिषदेत स्पष्ट केले.

बीड जिल्हाधिकारी कार्यालयात मंगळवार दिनांक १७ जून रोजी बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी पत्रकार परिषद घेऊन विविध संवेदनशील विषयावर माहिती दिली. यावेळी जिल्हा माहिती अधिकारी प्रशांत दैठणकर यांची उपस्थिती होती. पत्रकार

(उर्वरीत पान २ वर)





## बीड जिल्हाधिकाऱ्यांच्या कामाची महिला आयोगातर्फे ही विशेष दखल

छत्रपती संभाजीनगर येथे ऊसतोड कामगार महिलांच्या आरोग्य समस्या, बालविवाह, महिला अत्याचार या विषयांसंदर्भात महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांनी मराठवाडा विभागीय अधिकाऱ्यांसमवेत आढावा घेतला. गेल्या काही काळात प्रामुख्याने ऊसतोड कामगार महिलांच्या आरोग्य विषयक समस्या सोडविण्यासाठी व बालविवाह रोखण्यासाठी सुरू असलेली मोहिम आणखी प्रभावीपणे राबविण्यात यावी, असे निर्देश त्यांनी यावेळी दिले. बीडसह मराठवाडयातील अनेक जिल्हयात ऊसतोड महिला कामगार स्थलांतर करतात, त्यांच्या आरोग्याच्या अनेक समस्या समोर आल्या आहेत, यासाठी बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या संकल्पनेतून यावर्षी 'आरोग्य मित्र' उपक्रम राबविण्यात येत आहे, या उपक्रमा अंतर्गत ऊसतोडणीसाठी स्थलांतर करणाऱ्या महिलेसाठी त्याच समुहातील एकाची आरोग्य मित्र म्हणून नेमणूक करण्यात येणार आहे, आरोग्य मित्र ऊसतोड महिलेला येणाऱ्या आरोग्याच्या समस्याबाबात गावातील आशासेविका तसेच अंगणवाडी सेविकांच्या संपर्कात असेल. यातून ऊसतोडणीसाठी स्थलांतर करणाऱ्या महिलांना आरोग्याच्या सेवा तत्परतेने देणे शक्य होणार आहे, ही अभिनव संकल्पना नक्कीच उपयुक्त ठरेल असे त्यांनी स्पष्ट करून बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांचे कौतुक करत अभिनंदन केले.

## बिंदुसरा नदीला स्वच्छ ठेवा...

बीड शहरातून वाहणारी बिंदुसरा नदी जपणे, तिचे पावित्र्य राखणे प्रशासनासह सर्वांचीच जबाबदारी आहे. बिंदुसरा नदीचे पात्र स्वच्छ करण्यासाठी जलसंपदा, यांत्रिक विभाग, तसेच नाम फाउंडेशन, नगरपरिषद आदींच्या प्रयत्नातून जवळपास तीन किलोमीटर पर्यंत नदीचे पात्र स्वच्छ करण्यात आले आहे. आज पर्यंत ६९१ टिप्परच्या ट्रिपने जवळपास ७८ टन नदीपात्रातील गाळ काढण्यात आला आहे.अंदाजे ३१०९ टन कचरा झाडी झुडपी गवत इत्यादी नदीपात्रातून काढण्यात आलेले आहे. काढण्यात आलेला कचरा इमामपूर येथे डम्पिंग वार्ड मध्ये टाकण्यात आलेला आहे. तो बीड शहरापासून आठ किलोमीटर अंतरावर आहे. आता नदीपात्र स्वच्छ झाले आहे ते पुढे स्वच्छ रहावे ही जबाबदारी सर्वांनी घेणे गरजेचे आहे. नदीपात्रातील अतिक्रमणे देखील तात्काळ मोकळी झाली पाहिजेत यासाठी जनजागृती होणे गरजेचे असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

## जिल्हाधिकाऱ्यांच्या जनता दरबाराला उस्फूर्त प्रतिसाद..

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी बीडच्या जिल्हाधिकारी पदाचा पदभार घेतल्यानंतर आठवड्याच्या प्रत्येक सोमवार, मंगळवार व गुरुवार या दिवशी दुपारी १२ ते २ या कालावधीत त्यांनी जनता दरबार सुरू केला आहे. या जनता दरबारात आत्तापर्यंत ५३४ अर्ज तक्रारीचे प्राप्त झाले होते. त्यापैकी २८० अर्जावर तातडीने कारवाई करून अर्ज निकाली काढण्यात यश आलेले आहे. उर्वरित २३४ प्रकरणात कारवाई करण्यात येत असून जिल्हाधिकारी यांना प्राप्त होणारे अर्ज तक्रारीचे निराकरण तात्काळ करण्याचे आदेश संबंधित यंत्रणेला देण्यात आलेले आहेत.

# बोगस खरेदीखत तयार करून शासनाची फसवणूक

## गुन्हा दाखल करून केली कारवाईची मागणी

बीड ।प्रतिनिधी

धारूर येथे सर्वे नंबर ६२३ नावे नरबाग येथील कृषी परवाना नसताना बोगस खरेदीखत तयार करून शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी रफिक बाबामिया सय्यद, सादिक मुलानी बाबामिया आणि इतरांवर गुन्हा दाखल करण्यात यावा, या मागणीसाठी असद जिलानी कुरेशी यांनी जिल्हा प्रशासनाच्या कारवाईच्या आश्वासनामुळे उपोषण तूर्त स्थगित केले आहे. दरम्यान या प्रकरणी चौकशी करण्यासाठी जिल्हास्तरावर चौकशी समिती गठित करण्यात आली आहे.

धारूर येथील सर्वे नंबर ६२३ नुरबाग येथील कृषी परवाना नसताना सय्यद रफिक बाबामियां, सादिक मुलानी बाबामिया आणि इतरांनी खरेदीखत करण्यासाठी शासनाची फसवणूक केली. सदर कमी साक्षीदार सादिक मुलाने बाबा मिया व इरफान महमूद शेख यांनी बोगस खरेदीखत करण्यास मदत केली आहे. याप्रकरणी चौकशी करण्यात यावी या मागण्यासाठी अर्जदार असद जिलानी कुरेशी, राहील जब्बार शेख, फिरोज कासम सय्यद आणि सिराज अहमद शेख सर्व रा. धारूर यांनी जिल्हाधिकारी बीड यांना १८ मे रोजी निवेदन दिले. बोगस खरेदीखत करून शासनाची फसवणूक केल्या प्रकरणे संबंधित यावर गुन्हा दाखल करण्यात यावा अशी रितसर मागणी करण्यात आली. सदर प्रकरणात दिनांक २० फेब्रुवारी १९९३ चे बोगस व बेकायदेशीर कृषी परवाना जोडण्यात आले आहे. सहाय्यक संचालक नगर रचना कार्यालय बीड यांनी दिनांक २६ नोहेंबर २०२४ च्या पत्रानुसार

(उर्वरीत पान २ वर)



## पश्चिम महाराष्ट्रातील ४६ टक्के क्षेत्रासाठी ७४ टक्के पाणी तर मराठवाड्यातील २७ क्षेत्रासाठी केवळ ८ टक्के पाणी - नितीन पाटील

छत्रपती संभाजीनगर ।प्रतिनिधी

मराठवाड्याचा विकास करणे राज्यकर्त्यांचे कर्तव्य आहे केंद्र आणि राज्यातील सत्ताधाऱ्यांनी निधी वाटपात कायम अन्याय केल्याने मराठवाड्यातील प्रस्तावित अनेक धरणे निधी अभावी २० ते २२ वर्षापासून अपूर्णच आहेत परिणामी मागील वीस वर्षात म्हणावी तशी सिंचन क्षमता वाढलेली नाही. मराठवाड्यातील वहीतीलायक २७ टक्के क्षेत्रासाठी केवळ आठ टक्के पाणी उपलब्ध आहे तर पश्चिम महाराष्ट्रातील वहीतीलायक ४६टक्के क्षेत्रासाठी ७४ टक्के पाणी तर विदर्भातील २७ टक्के क्षेत्रासाठी १८ टक्के पाणी उपलब्ध आहे.

मराठवाड्यातील ७० टक्के भाग कमी पर्जन्यमानाचा प्रदेश म्हणून ओळखला जातो यामुळे मराठवाड्यातील एकूण क्षेत्रफळाच्या २७टक्के क्षेत्रच वहीतीलायक आहे लहरी निसर्गावर अवलंबून असलेल्या वहीतीलायक क्षेत्राला बाराही महिने

## जिल्हा प्रशासनाने विद्यार्थ्यांच्या शाळा प्रवेशांच्या स्वागताचा इव्हेंट बंद करून धोकादायक

**मोडकळीस आलेल्या सरकारी शाळांना भेटी देऊन मुलभूत सुविधा द्याव्यात - डॉ.गणेश ढवळे**



बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्हा प्रशासनाने विद्यार्थ्यांच्या शाळा प्रवेशांच्या स्वागताचा इव्हेंट बंद करून धोकादायक, मोडकळीस आलेल्या सरकारी शाळांना भेटी देऊन मुलभूत सुविधा द्याव्यात अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी केली आहे.बीड जिल्हा प्रशासन आणि शिक्षण विभागाने आयोजित दि.१६ सोमवार रोजी शाळेच्या पहिल्या दिवशी प्रवेशोत्सवात जिल्हाधिका-यांचे १०० अधिकारी आणि लोकप्रतिनिधी शाळांमध्ये हजर राहिले यात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन कारेगव्हाण येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत, मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके यांच्यासह शिक्षणाधिकारी ( प्राथमिक) भगवान फुलारी, शिक्षणाधिकारी ( माध्यमिक) संजय पंचगल्ले,

(उर्वरीत पान २ वर)

## महावीज वितरण कार्यालयात कर्मचाऱ्यांनची चाललेली अरेरावी, भ्रष्टाचार न थांबल्यास तीव्र आंदोलन छेडणार - जिल्हाप्रमुख गणेश वरेकर

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील महावीज वितरण कार्यालयात, प्रचंड अनागोंदी कारभार चालला असुन , प्रचंड भ्रष्टाचार चालला आहे, सुशिक्षित बेरोजगार कंत्राटी अभियंते या कार्यालयात विविध कामे करतात पण त्यांना या कामासाठी खुप आडवणुक केली जाते व पैसै मागितले जातात तसेच इतरही विविध कामांसाठी पैसे मागितले जातात व सर्वसामान्य लोकांनची अडवणूक केली जाते या सर्व विषयांवर पक्षाच्या वतीने



अधिक्षक अभियंता राजपुत साहेब यांची भेट घेऊन जिल्हाप्रमुख गणेश भाऊ वरेकर यांच्या नेतृत्वाखाली व तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन यांच्या प्रमूख उपस्थित त्यांना सविस्तर सांगून निवेदन देण्यात आले आहे.

जर हा प्रकार बंद न झाल्यास जिल्हा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन करण्याचा इशारा जिल्हाप्रमुख गणेश वरेकर यांनी दिला आहे. यावेळी

(उर्वरीत पान २ वर)

# वादळी वाऱ्याने शेतकऱ्याच्या सौलार पॅनलचे नुकसान




घनसावंगी ।प्रतिनिधी

घनसावंगी तालुक्यातील मौजे वडीरामसगाव शिवारातील गट क्र.१४७ मधील शेतकरी विश्वंबर गणपत जाधव यांच्या शेतातील G K Energy PVT.LTD कंपनीच्या सोलारचे पॅनल वादळी वाऱ्याने एक पॅनल पूर्णपणे फुटल्याने शेतकऱ्याचे खूप नुकसान झाले असून कंपनी कडून नुकसान भरपाई मिळण्याची अपेक्षा शेतकऱ्याकडून व्यक्त करण्यात आली आहे.

# रत्नागिरी, पुणे घाट, सातारा घाट, कोल्हापूर घाट, सिंधुदुर्ग जिल्ह्यांना पुढील २४ तासांसाठी ऑरेंज अलर्ट

## राज्य आपत्कालीन कार्य केंद्राची माहिती

मुंबई ।प्रतिनिधी

भारतीय हवामान विभागाकडून देण्यात आलेल्या अंदाजानुसार पुढील २४ तासाकरिता रत्नागिरी, पुणे घाट, सातारा घाट, कोल्हापूर घाट, सिंधुदुर्ग जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे.राज्यात मागील २४ तासांमध्ये (१७ जून २०२५ रोजी सकाळपर्यंत) मुंबई उपनगर जिल्ह्यात ८३.४ मिमी पाऊस झाला आहे. तर ठाणे जिल्ह्यात ७३.७ मिमी, मुंबई शहर ६२.९ मिमी, रायगड ५४.१ मिमी आणि पालघर जिल्ह्यात ४९.७ मिमी पावसाची नोंद झाली आहे.

राज्यात कालपासून आज १७ जून २०२५ रोजी सकाळपर्यंत झालेल्या पावसाची सरासरी आकडेवारी पुढीलप्रमाणे (सर्व आकडे मिलिमीटरमध्ये) :- ठाणे ७३.७, रायगड ५४.१, रत्नागिरी ४७.७, सिंधुदुर्ग १२.७, पालघर ४९.७, नाशिक ७.७, धुळे ७.१, नंदुरबार ४, जळगाव ६.७, अहिल्यानगर १.१, पुणे ११.९, सोलापूर ०.९, सातारा १९.७, सांगली ६, कोल्हापूर १७.८, छत्रपती संभाजीनगर ०.६,जालना ०.१, बीड ०.७, लातूर ०.१, धाराशिव १.६, नांदेड ३.६, परभणी १.७, हिंगोली ३.६, बुलढाणा ३.५, अकोला ८.७, वाशिम ८.५, अमरावती ९.४, यवतमाळ ८.७, वर्धा ७.६, नागपूर ०.९, गोंदिया ०.२, चंद्रपूर ११.९ आणि गडचिरोली जिल्ह्यात ५.२ मिमी पावसाची नोंद झाली आहे.रत्नागिरी जिल्ह्यातील जगबुडी नदी इशारा पातळीवर आहे. जिल्हा प्रशासनामार्फत नागरिकांना सतर्क

(उर्वरीत पान २ वर)

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777
6 x 6.5

# नौकरीच्या संधी विपुल ; विद्यार्थ्यांकडे हवे 'स्किल आणि विल' - शिक्षणतज्ज्ञ प्रा.प्रदीप रोडे

### आवडीचे करिअर निवडण्यासाठी पालकांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन द्यावे : सर नागेश जोंधळे
### नालंदा आणि आई फाऊंडेशन यांचा संयुक्त उपक्रम - निःशुल्क करिअर गाईडन्स सेमिनार, तज्ज्ञांचे मार्गदर्शन व गुणवंतांचा सत्कार

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

नालंदा फाऊंडेशन, बीड व आई फाऊंडेशन, अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने अंबाजोगाईत रविवार, दिनांक १५ जुन २०२५ रोजी शहरातील आद्यकवी मुकुंदराज सांस्कृतिक सभागृहात निःशुल्क करिअर गाईडन्स सेमिनार व विविध क्षेत्रातील तज्ज्ञांचे मार्गदर्शन आणि गुणवंतांच्या भव्य सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

इयत्ता १० वी, १२ वी, पदविका व पदवीनंतर पुढे काय ? असा प्रश्न विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांना नेहमीच पडतो. अशावेळी आपल्या पाल्याला व आपल्या स्वतःला जर निःशुल्क करिअर गाईडन्स सेमिनार व विविध क्षेत्रातील तज्ज्ञांचे मार्गदर्शन मिळाले तर किती बरे होईल. म्हणून हाच विधायक हेतू व सकारात्मक विचार करून नालंदा फाऊंडेशन, बीड व आई फाऊंडेशन, अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने अंबाजोगाईत निःशुल्क करिअर गाईडन्स सेमिनार व विविध क्षेत्रातील तज्ज्ञांचे मार्गदर्शन आणि इयत्ता १० वी, १२ वी उत्तीर्ण गुणवंत विद्यार्थी तसेच समाजाच्या विविध क्षेत्रात सातत्यपूर्ण सर्वंकष कामगिरी करीत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या मान्यवरांच्या भव्य सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिक्षणतज्ज्ञ प्रा.प्रदिप रोडे (संस्थापक, नालंदा फांऊडेशन, बीड.) हे होते. तर यावेळी विचारमंचावर प्रमुख मार्गदर्शक म्हणून सहयोगी अधिष्ठाता तथा प्राचार्य डॉ.बाबासाहेब ठोंबरे (कृषी महाविद्यालय, लातूर) आणि प्रभावी करिअर मार्गदर्शक म्हणून सर नागेश जोंधळे (संस्थापक, आई सेंटर प्रो तथा प्रेरणादायी वक्ते) तसेच यावेळी राजेंद्र घोडके (सामाजिक कार्यकर्ते), विधीज्ञ व कायदेशीर सल्लागार ॲड.राहुल




बनसोडे (नाशिक), प्रा.राम गायकवाड (बीड) या मान्यवरांची विशेष उपस्थिती होती. प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिराव फुले, सावित्रीमाई फुले आणि भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर या महामानवांना अभिवादन करण्यात आले. सुरूवातीला डॉ.विकास वाघमारे यांनी प्रास्ताविक केले. त्यानंतर उपस्थित मान्यवरांचे आयोजकांकडून स्वागत करण्यात आले. तर मान्यवरांच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय सन्मान - २०२५ पुरस्कार जगन सरवदे (सामाजिक), रणजित डांगे (पत्रकारिता), सर नागेश जोंधळे (लीडरशिप व नेशन बिल्डिंग), डॉ.किर्तीराज लोणारे आणि प्राचार्या स्वाती त्रिशोक वाकळे (शिक्षण), प्रा.सुनिल वाघमारे व सुमित खोत (माहिती तंत्रज्ञान) यांना सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आले. सोबतच 'द आयडीयल इंडियन बुक ऑफ रेकॉर्ड्स' चे मानकरी सहयोगी अधिष्ठाता तथा प्राचार्य डॉ.बाबासाहेब ठोंबरे (कृषी महाविद्यालय अंबाजोगाई येथील परिसरात ३० हजार वृक्ष लागवडीकरीता), कु.श्रेया पुनम ढोले (एक लाख इंग्रजी वाक्य लिहील्याबद्दल), पंकज भटकर यांनी धम्म लिपीतील स्व:हस्ताक्षरात व कोरीव काम करून तयार केलेले भारतातील प्रथमच घराचे नांव फलक करण्याचा विक्रम केल्याबद्दल. आणि आय ई सेंटर प्रो या संस्थेने भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवानिमित्त १५ ऑगस्ट २०२४ रोजी विश्वविक्रमवीर लेखक सर नागेश जोंधळे यांच्या संकल्पनेतून व नेतृत्वात 'भारतीय संविधान भान आणि सामाजिक जाण' या देशभक्तीचा अभिनव उपक्रमातून मानवी साखळी करून भारतीय संविधानातील मूळ ३९५ कलमांचे फलक तयार करून व त्याचे मानवी साखळी करून वाचन करून विविधतेत एकात्मतेचा संदेश दिला त्याबद्दल गौरवपूर्ण सन्मान करण्यात आला. यावेळी पुढील विद्यार्थ्यांना आई सेंटर प्रो-चॅम्पियन इन मी-पुरस्कार देण्यात आले. यातील विजेते सान्वी गुट्टे (प्रथम), विश्वेश्वरी सरदेशमुख (द्वितीय), श्रेयश तिडके (तृतीय) तसेच पंकजा काळे, गीतांजली केंद्रे, आदिल शेख, आशिष साखरे, योगश्री म्हेत्रे, शिवतेज अंजान, द्रोण जाधव हे उत्तेजनार्थ पारितोषिकांचे मानकरी ठरले. तसेच आई सेंटर प्रो-द डायनॅमिक कम्युनिकेटर आत्मविश्वासाने आणि अस्खलितपणे इंग्रजी बोलण्याचे ३१ दिवसांचे आव्हान लिलया पार पाडणारे विजेते - माहेश्वरी सरदेशमुख (प्रथम), समर्थ साखरे (द्वितीय), हुजैफ शेख (तृतीय) तसेच उझैर शेख, नयन जाधव, बलराज गायकवाड, अर्णवी केंद्रे, मनस्वी वाघमारे, जयंत वाघमारे, सोहम अंबड, विश्वेश्वरी सरदेशमुख, सोनम सानप, आदर्श वाघमारे, अमृता जाधव, स्वराज जावळे, वैशाखी चोपडे, आदिश्री बिराजदार, प्रथमेश झिटे, श्रीरंग तिडके हे उत्तेजनार्थ पारितोषिकांचे मानकरी ठरले. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलताना शिक्षणतज्ज्ञ प्रा.प्रदीप रोडे म्हणाले की, विद्यार्थ्यांना करिअर विषयी योग्य मार्गदर्शन, माहिती मिळावी, त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण व्हावा असा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश व विधायक हेतू आहे. अंबाजोगाई हे मराठवाड्याचे पुणे आहे.

## संपादकीय

# पूल दुर्घटनेची पुनरावृत्ती नको...

अहमदाबाद येथील भीषण विमान अपघाताच्या स्मृती ताज्या असतानाच महाराष्ट्र आणि उत्तराखंड या राज्यांत दोन अपघात घडले. दोन्हींचे एकच कारण आहे ते म्हणजे, पर्यटकांचा अति उत्साह आणि प्रशासनाच्या सूचनांचे पालन न करता आपले वाहन संकटात टाकणे अन् मृत्यूला कवटाळणे. मावळमधील अपघात हा अशा प्रकारच्या पहिलाच अपघात नव्हे, तर त्या अगोदरही अशा प्रकारचे अपघात घडले आहेत. मावळमधील इंद्रायणी नदीच्या पुलावर कुंडमळा येथे अपघात घडला तो पूल खूप अरुंद आहे. तेथे वाहने घेऊन जाऊ नका, म्हणून वारंवार प्रशासनाकडून सूचना देण्यात येतात. पण पर्यटक ऐकत नाहीत आणि रविवारी दुपारी अपघात घडला तेव्हा त्या अरुंद पुलावर अनेक पर्यटक होते हे समजले आहे. हे पर्यटक पाणी पाहण्यासाठी जातात आणि वाहत्या पाण्यात कित्येक पर्यटक जीव गमावून बसले. कित्येक जण वाहून गेले, तर कित्येक बेपत्ता आहेत. आता त्यांची चौकशी होईल आणि नेमकी किती प्राणहानी झाली आहे तो आकडा समोर येईल. पण प्राथमिक आकडेवारीनुसार दहा ते पंधरा पर्यटक वाहून गेले असल्याची माहिती आहे.

राज्य सरकारने सर्व पुलांचे ऑडिट करण्याचे आदेश दिले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तातडीने सर्व पुलांची दुरुस्ती करण्याचे आदेश दिले आहेत. आता वारी पुढे आहे आणि लाखो वारकरी येणार आहेत. त्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने उपाययोजना केल्या पाहिजेत. पण त्या अगोदरच या दुर्घटनेने प्रशासनाच्या डोळ्यांत चांगले अंजन घातले आहे. मावळ तालुक्यातील पर्यटकांचे आकर्षण म्हणून ओळख असलेला तळेगाव-दाभाडे येथील कुंडमळा हे ठिकाण प्रसिद्ध पर्यटन स्थळ आहे. पण काल दुपारी निसर्ग शोभेची मौज पाहण्यासाठी आलेल्या पर्यटकांना आपला जीव गमवावा लागला आहे. पूल पडल्यामुळे पर्यटक नदीच्या पाण्यात वाहून गेले आहेत. सुमारे सहा मृतदेह हाती लागले आहेत. म्हणजे घटना किती गंभीर आहे हे लक्षात येईल. हा पूल जीर्ण झाला असून मागील वर्षभरापूर्वी या पुलाच्या दुरुस्तीसाठी सहा कोटींचा निधी मंजूर करण्यात आला होता. पण त्याचे काम सुरू झाले नाही. या दिरंगाईला जबाबदार असणारेच या अपघाताला कारण आहेत हा निष्कर्ष काढता येतो. अपघात घडला तेव्हा १०० जण पुलावर उभे होते असेही समजले आहे. पण त्यांना कोणीही अटकाव केला नाही.

रविवारी या अपघाताच्या जीवघेण्या कळा उठायच्या आधीच उत्तराखंडमध्ये आणखी एक भीषण अपघात घडला होता आणि त्यात सातही प्रवासी मृत्युमुखी पडले. आर्यन अव्हिएशनचे हेलिकॉप्टर ५.१७ वा. अवकाशात उड्डाण करण्यासाठी झेपावले आणि हवामानाच्या खराब अवस्थेमुळे आणि कमी दृष्यमानता असल्यामुळे कोसळले. सदरचा अपघात हा गुप्तकाशी येथे झाला आणि हेलिकॉप्टर केदारनाथ येथे चालले होते. हेलिकॉप्टर अवकाशात उडाले तेव्हा हवामान अजिबात चांगले नव्हते आणि तरीही वैमानिकाने तसेच हेलिकॉप्टर पुढे नेले. कमी दृष्यमानता आणि खराब हवामान ही कारणे देण्यात आली आहेत. कमी दृष्यमानतेमुळे अपघातांचा धोका वाढतो आणि त्यामुळे भारतीय हवाई दलाचे एमआय १७ चॉपर वारा आणि वजनामुळे आपले तोल गमावून बसले आणि कोसळले अशी प्राथमिक कारणे सांगतात.

मावळमधील दुर्घटना असो किंवा हेलिकॉप्टर अपघात, प्रथम समोर येते ती प्रवासाची आवड... परिणामी कसलाही सारासार विचार न करता लोक प्रवासाला निघतात. ते हवामान कसे आहे आणि पाऊस असल्यामुळे हेलिकॉप्टर किंवा विमानाची दृष्यमानता आहे की नाही, हेही तपासण्याचे कष्ट घेत नाहीत. उत्तराखंड तर लांब आहे.

# वडवणीत रामलिंग पतसंस्थेकडून गुणवंतांच्या पाठी कौतुकाची थाप

## विद्यार्थ्यांनी आवडीनुसार शिक्षण घेतल्यास यश हमखास - चेअरमन नारायण डिगे

वडवणी (प्रतिनिधी)

आजचे युग हे स्पर्धेचे युग जरी असले तरी या स्पर्धेत इतरांशी स्पर्धा न करता प्रत्येकाने स्वतःशीच स्पर्धा केली पाहिजे. आपली बौध्दीक क्षमता ओळखून सर्व विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीनुसारच शिक्षण घ्यावे. आपली आवड व कल विचारत घ्यावा. असे केले तर त्यांच्या यशस्वीतेचा मार्ग अधिक सुकर होईल. यशाचा यशोशिखर जिद्दीने, चिकाटीने व कठोर परिश्रमाने सहजरित्या गाठता येईल. त्यामुळे विद्यार्थ्यांनी शिक्षणालाच सर्वोच्च केंद्रबिंदू मानून पुढील वाटचाल करावी. आता जास्त गुण घेतले म्हणजे आपण खुप मोठी गोष्ट केली असे नसते त्यात सातत्य ठेवणे आव्हानात्मक असते. तसेच ज्यांना कमी गुण मिळाले आहेत त्यांनी निराश न होता यापुढे अधिक प्रगल्भतेने जास्तीत जास्त गुण कसे मिळविले जातील यासाठी प्रयत्न करत राहावे. आज रामलिंग पतसंस्थेने गुणवंतांच्या पाठी दिलेली ही कौतुकाची थाप निश्चितपणे आगामी काळात सर्वांना दिशादर्शक ठरेल असे प्रतिपादन रामलिंग पतसंस्थेचे चेअरमन नारायणराव डिगे यांनी गुणवंतांच्या गुणगौरव सोहळ्याप्रसंगी व्यक्त केले.

याबाबत अधिक माहिती अशी की, सामाजिक, वैद्यकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक, धार्मिक उपक्रमांमध्ये नेहमी हिरारीने सहभागी होत वडवणी येथील रामलिंग नागरी सहकारी पतसंस्था यांच्या वतीने वेळोवेळी सामाजिक बांधिलकी ही जोपासली जाते. वडवणी शहर व तालुक्यातील गुणवंतांचा गुणगौरव सोहळ्याचे आयोजन दरवर्षी रामलिंग पतसंस्थेच्या वतीने करण्यात येते. या अनुषंगाने यावर्षीही दिनांक १६ जून २०२५ सोमवार रोजी रामलिंग नागरी सहकारी पतसंस्थेच्या सभागृहामध्ये इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी बोर्डाच्या व इतर परीक्षेतील



वडवणी तालुक्यातील सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या सोहळ्याला मुख्य अतिथी म्हणून ह.भ.प.नवनाथ महाराज चिनके हे उपस्थित होते. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पतसंस्थेचे चेअरमन नारायणराव डिगे हे उपस्थित होते. तर प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ नेते नारायणराव शेळके, व्यंकटेश गार्डी, शाहू विद्यालयाचे प्राचार्य सानप सर, ईश्वर कुरकुटे सर, शिवाजीराव टकले, अर्जुनराव भंडारे, वैजनाथ डिगे, तसेच व्हाईस चेअरमन सुरेशराव ढवळशंक, व्यवस्थापक दिगांबरराव गुरसाळी, माजी चेअरमन कचरुशेठ झाडे, माजी व्हाईस चेअरमन सर्जेराव महाराज आळणे, सर्वश्री संचालक नवनाथराव म्हेत्रे, अरुणराव गुरसाळी, प्रकाशराव डिगे, उपमन्यूजी वारे, सुभाषराव वाव्हळ, बाबासाहेब मस्के, श्रीमती.सिताबाई रामभाऊ डिगे, सौ.रंजनाताई शिवाजीराव टकले, सौ.शैलजाताई अर्जुनराव भंडारे यांसह पालक, पतसंस्थेचे ग्राहक, सभासद व गुणवंत विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी सर्वप्रथम श्री.चौंडेश्वरी माता यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करुन अभिवादन करण्यात आले. त्यानंतर पतसंस्थेच्या वतीने सर्व मान्यवरांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देवून स्वागत सत्कार करण्यात आला. त्यानंतर वडवणी तालुक्यातील सर्व माध्यमिक विद्यालय व महाविद्यालयातील इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी बोर्डाच्या परीक्षेत नेत्रदिपक कामगिरी करत गुणवंत ठरलेल्या एकूण जवळपास ५० च्यावर गुणवंतांचा रोख पारितोषिक, स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र व शाल, पुष्पगुच्छ देवून मान्यवरांच्या हस्ते गुणगौरव करण्यात आला. यावेळी सर्व विद्यार्थ्यांसोबत त्यांच्या पालकांचाही गौरव करण्यात आला. गुणगौरव झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये प्रामुख्याने इयत्ता दहावीतील हर्षदा हनुमंत नाईकवाडे, साक्षी योगीराज खाडे, शेख रेहान खलील, बोंगार्डे प्रथमेश निरंजन, जाधव श्रावणी शंकर, जाधव पृथ्वीराज रविंद्र, तसेच इयत्ता बारावी विज्ञान शाखेतील आयुष व्यंकटेश गार्डी, अभिषेक लक्ष्मण खामकर, विकास बाळासाहेब सानप, शितल केंद्ळे, पायल भाऊसाहेब धायतिडक, प्रतिक्षा महादेव लोंढे, अपेक्षा अरुण सावंत, स्वाती ज्ञानेश्वर वांडरे, इयत्ता बारावी कला शाखेतील निकिता ज्ञानोबा घोरड, वैष्णवी गोवर्धन घुमरे, निखिल विलास जाधव, अश्विनी संतोष लांबाटे, मुक्ताबाई गोरख गायकवाड, सानिका भागवत जेधे, केशव महादेव हिरे, तनुजा बालाजी राऊत, इयत्ता बारावी वाणिज्य शाखेतील करण मारुती झोडगे, नेहा अभिमन्यू चव्हाण, तसेच कोष्टी समाजातील इयत्ता दहावीमध्ये तब्बल ९० टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळवणारे गुणवंत निकिता नवनाथ झाडे, मधुरा प्रभाकर दिंडकर, आर्यन अनिल म्हेत्रे, संस्कृती योगेश शेळके, प्रतिक्षा लक्ष्मण करडकर, पुष्कर प्रकाश कुरकुटे, व बालाघाट पब्लिक स्कूल तेलगांव येथून प्रथम आलेली गायत्री शिवप्रसाद गुरसाळी या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. त्याचबरोबर नुकताच निकाल जाहीर झालेल्या वैद्यकीय नीट परीक्षेत ५३४ गुण मिळवणारा आयुष व्यंकटेश गार्डी याचाही विशेष सत्कार करुन गौरव करण्यात आला. यावेळी पुढे बोलतांना चेअरमन नारायणराव डिगे म्हणाले की, सर्व गुणवंतांच्या या नेत्रदिपक यशाचा निश्चितपणे आम्हाला सार्थ अभिमान वाटतो. आजचा हा सत्कार तुमचा आणि तुमच्या कर्तुत्वाचा आहे. आपण आगामी काळातही अशाच प्रकारे यशाचे यशोशिखर गाठून आपल्या कुटुंबाचे, गावाचे, जिल्ह्याचे, राज्याचे व देशाचे नाव उज्वल करावे अशाही शुभेच्छा डिगे यांनी गुणवंतांना दिल्या. याप्रसंगी अनेक मान्यवरांनी आपली मनोगते व्यक्त करुन गुणवंतांना शुभेच्छा देत त्यांचे कौतुक केले.




**मुंबई ।प्रतिनिधी**

**राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांची मंगळवार (दि.१७) रोजी मुंबई येथील मंत्रालयीन कार्यालयात अखिल भारतीय संतुजी ब्रिगेडच्या प्रतिनिधींनी भेट घेत शाल घालून व सत्कार करण्यात आला. यावेळी संघटनेकडून सत्यशोधक डॉ. संतुजी रामजी लाड यांची प्रतिमा, त्यांच्या जीवन व कार्यावरील पुस्तिका ना. भुजबळ यांना भेट देण्यात आली. यावेळी अखिल भारतीय संतुजी ब्रिगेडचे संस्थापक अध्यक्ष ड. प्रदीपसिंह गंगणे, डॉ. संतुजी लाड स्टुडंट असोसिएशनचे प्रदेशाध्यक्ष साईनाथ घोणे यांनी उपस्थिती होती. मंत्री भुजबळ यांनी संतुजी ब्रिगेडच्या सामाजिक कार्याचा गौरव करत त्यांच्या प्रयत्नांना पाठिंबा दर्शविला.**

## पान १ वरून..

**बालविवाह तसेच ऊसतोड....**

परिषदेत पुढे अधिक माहिती देताना जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन म्हणाले की,बीड जिल्ह्यात २०१९ मध्ये स्त्रियांच्या गर्भ पिशवी काढण्याबाबत तक्रारी आल्यावर याबाबत विशेष धोरण ठरविण्यात आले असून यात गरज असेल तरच या प्रकारची शस्त्रक्रिया करण्यास परवानगी दिली जाते. २०१९ पासून आज पर्यंत केवळ २६७ शस्त्रक्रिया झाल्या आहेत. तथापि माध्यमांनी याबाबत दिलेली आकडेवारींची माहिती वस्तुस्थितीला धरून नाही. बीड जिल्ह्यात याबाबत अतिशय काटेकोरपणे विशिष्ट नेमून दिलेल्या पद्धतीने तपासणी करून मगच अशा शस्त्रक्रियांना मान्यता देण्यात येत आहे.याबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी गेल्या सहा वर्षातील वर्षनिहाय तसेच वयनिहाय झालेल्या शस्त्रक्रियांची आकडेवारी माध्यमांसमोर सादर केली. हा विषय अत्यंत संवेदनशीलरित्या हाताळला जात असून या अनुषंगाने आगामी काळात ऊस तोडीसाठी जाण्यापूर्वी व ऊस तोडून परत आल्यानंतरही सर्व महिलांची तपासणी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.त्याबाबत आगामी काळात शिबिरांचे आयोजन ही करण्यात येणार अशी माहिती दिली.

ऊसतोड महिला मजुरांपैकी गर्भ शस्त्रक्रिया झालेल्या महिलांची वर्षनिहाय स्थिती याप्रमाणे,खाजगी संस्थेत झालेल्या शस्त्रक्रिया सन २०१९ मध्ये २२, सन २०२० मध्ये ४, सन २०२१ मध्ये ३०,सन २०२२ मध्ये ४९, सन २०२३ मध्ये ८३, सन २०२४ मध्ये ५५ आणि सन २०२५ मार्चपर्यंत १७ अशा एकूण २६० तर शासकीय संस्थेत झालेल्या शस्त्रक्रिया सन २०१३ मध्ये ६ व मार्च सन २०२५ पर्यंत १ अशा एकूण २६७ शस्त्रक्रिया या कालावधीत झालेल्या आहेत. यात ३५ वर्षाखालील महिलांची संख्या केवळ १ इतकी आहे असेही त्यांनी स्पष्ट केले.

आरोग्य विभाग जिल्हा परिषद अंतर्गत ऑगस्ट २०२४ ते ऑक्टोबर २०२४ या कालावधीत प्राथमिक आरोग्य केंद्रांवर २२२ आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन देखील करण्यात आले होते अशी माहिती जिल्हाधिकाऱ्यांनी या पत्रकार परिषदेत दिली.या कालावधीत ७८ हजार ४७६ महिला ऊस तोडणी गेलेल्या होत्या त्यापैकी ३४,१५१ महिला मजूर या ३० वर्षाखालील होत्या. ऊस तोडणीस गेलेल्या एकूण महिला मजुरांपैकी १५२३ महिला गर्भवती होत्या यापैकी १३५ महिला मजुरी अति जोखमेच्या गरोदर माता होत्या. तसेच ऊस तोडणीस गेलेल्या एकूण महिला मजुरांपैकी ८४३ मजुरांची गर्भ शस्त्रक्रिया झालेली होती. परंतु त्या ऊस तोडीस जाण्यापूर्वी लगतच्या कालावधीत झालेल्या नसून आरोग्य विषयक विविध समस्यांमुळे त्या वेगवेगळ्या कालावधीत झालेल्या आहेत असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

**जिल्हा प्रशासनाने विद्यार्थ्यांच्या ...**

उपशिक्षणाधिकारी भगवान सोनावणे,शिक्षण विस्तार अधिकारी मधुकर तोडकर, आदींनी नविन प्रवेशित विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. याच वेळी

बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या अकरा तालुक्यातील ३४९ शाळांच्या ५९२ वर्गखोल्या अत्यंत धोकादायक असुन ४६८ शाळांमधील ८५६ वर्गखोल्यांची तातडीने दुरुस्ती करणे आवश्यक असुन ग्रामीण भागातील ७७२ शाळांना वीजपुरवठा नाही तर थकीत वीज बिलामुळे ६२० शाळांमधील वीजपुरवठा खंडित केला असुन विद्यार्थ्यांचे संगणक,ई लर्निंग,वीज उपकरणे बंद असल्याने डिजिटल शैक्षणिक नुकसान होत असुन तातडीने उपाययोजना करण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली असुन जिल्हा प्रशासन आणि शिक्षण विभागाने इव्हेंट करण्यापेक्षा बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या धोकादायक व मोडकळीस आलेल्या शाळांना भेटी देऊन शाळांची दुरूस्ती व पुनर्बांधणी करण्यात यावी अशी मागणी केली आहे.

**बोगस खरेदीखत ....**

रेखांकनाची शिफारस या कारल्याच्या अभिलेखा नुसार दिसून येत नाही असे नमूद केले आहे. सदर बोगस खरेदीखत प्रमाणपत्राच्या आधारे शासनाची फसवणूक

## पान १ वरून..

केल्याची तक्रार करण्यात आली आहे.दरम्यान याबाबत निवासी उपजिल्हाधिकारी बीड यांनी मौजे धारूर येथील अकोषित परवाना नसतानाबोगस खरेदी खत तयार करून शासनाची फसवणूक केल्या प्रकरणाच्या असत जिल्याने कुरेशी यांच्या १५ ५ २०२५ च्या तक्रार अर्जानुसार उपविभागीय अधिकारी, माजलगाव आणि सह जिल्हा निबंधक (वर्ग-१) बीड यांची समिती गठित केली आहे. या समितीने बोगस दस्त खरेदीखत क्रमांक १९४/ २०२५ दिनांक ३० जानेवारी २०२५ आणि खरेदीखत २१६/ २०२५ दिनांक ३ फेब्रुवारी २०२५ रोजी तयार करून शासनाची फसवणूक केल्याची तक्रार केली. याप्रकरणी संबंधित व्यक्तीवर तात्काळ कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी अर्जदारांनी केली आहे. संदर्भीय अर्जदार असद जिलानी कुरेशी व इतरांची तक्रार व सहपत्रके याबाबत योग्य ती चौकशी करून नियमानुसार कार्यवाही अनुसरावी व अहवाल तत्काळ सादर करावा, असे पत्रात नमूद केले आहे.सादिक मुलानी बाबामिया यांनी या प्रकरणात खोटे दस्तऐवज करण्यास मदत केली आहे. कारवाईच्या आश्वासनामुळे दिनांक २७ रोजी चे उपोषण तूर्त स्थगित करण्यात आले आहे.

**महावीज वितरण कार्यालयात ..**

तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन, जिल्हा सहसचिव श्रीकृष्ण गायकेयुवा नेते मुकेश भैय्या घुमरे,आसाराम खांडे , संतोष काळे , हनुमान उगले , अनंत खांडे , गणेश चव्हाण, अर्जुन गायकवाड,करण गायकवाड हे उपस्थित होते.

**रत्नागिरी, पुणे घाट, सातारा...**

राहाण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.रत्नागिरी येथे मुंबई- गोवा महामार्गावरील खेड तालुक्यातील वळंजवडी येथे महामार्गावर १०० मीटर परिसरात भेगा पडल्याने या महामार्गावरील वाहतूक एकेरी मार्गावरून सुरू आहे.सातारा जिल्ह्यातील पाटण-चिपळूण राष्ट्रीय महामार्गावर वाहतुकीसाठी केलेला पर्यायी रस्ता पाण्याखाली जाऊन खचल्याने वाहतूक बंद करण्यात आली आहे. दुचाकी व चार चाकी वाहतूक नेरळे- माणगाव- मणेरी- चाफेर-संगमनगर धक्का मार्गे कोयनानगर अशी वळवण्यात आली आहे.मुंबई उपनगर जिल्ह्यात पाण्यात बुडून एक व्यक्ती आणि मातीच्या ढिगाऱ्याखाली सापडून एका व्यक्तीचा मृत्यू झाला आहे. तर झाड पडून तीन व्यक्ती जखमी, स्लॅब पडून दोन व्यक्ती जखमी आणि भिंत पडून दोन व्यक्ती जखमी झाल्या आहेत. तसेच यवतमाळ जिल्ह्यात पाण्यात बुडून एक व्यक्तीचा मृत्यू झाला असून धुळे जिल्ह्यात भिंत पडून चार प्राण्यांचा मृत्यू झाला आहे, अशी माहिती राज्य आपत्कालीन कार्य केंद्राकडून देण्यात आली आहे.

## वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**गेवराई, जि. बीड येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री. आर. ए. मिसाळ यांच्या न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ४६७/२०२५**
**गोकुळ बप्पाजी उर्फ बप्पासाहेब धस / निरंक**
**(मार्फत ॲड. एस. एल. मेघारे)**

ज्याअर्थी मयत नामे १ . बप्पाजी उर्फ बप्पासाहेब पि. रामचंद्र धस हे / हया दिनांक ०८/१२/२०२३ रोजी मौजे तळणेवाडी ता गेवराई जि. बीड २. कमलबाई भ्र. बप्पाजी उर्फ बप्पासाहेब धस हे / हया दिनांक १०/०८/२०२१ रोजी रा. तळणेवाडी ता गेवराई जि. बीड मयत झाले/झाल्या आहेत. अर्जदार १. गोकुळ बप्पाजी उर्फ बप्पासाहेब धस वय . ४३ वर्षे धंदा :शेती रा. तळणेवाडी ता. गेवराई जि. बीड माणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत बप्पाजी उर्फ बप्पासाहेब पि. रामचंद्र धस व नामे कमलबाई भ्र. बप्पाजी उर्फ बप्पासाहेब धस यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १६/०६/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख ०४/०८/२०२५

**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

**आदेशावरून**
**स्वाक्षरित/-**
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

# आनंददायी आणि दर्जेदार शिक्षण जिल्हा परिषद शाळेतच मिळते - अमोल जगताप

## जिल्हा परिषदेच्या शाळेतूनच अनेक उच्चपदस्थ अधिकारी घडले जातात



आष्टी (प्रतिनिधी)

सध्याच्या शिक्षण पद्धतीमध्ये मराठी माध्यमाच्या शाळा बाजूला जाऊन इंग्रजी माध्यमांनी त्यावरती अतिक्रमण केल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. परंतु मराठी शाळा टिकल्या तरच गरीब, कष्टकरी, सर्वसामांन्याची मुले शिक्षण घेतील नाहीतर इंग्रजी माध्यमाच्या शाळेला पहिलीच्या वर्गापासूनच लाखो रुपयांच्या फीस घेतल्या जातात परंतु शिक्षण मात्र तसं मिळत नाही. याउलट जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये मोफत, दर्जेदार आणि आनंददायी शिक्षण मिळते. यासाठी पालकांनी आपल्या मुलाचा जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये प्रवेश घेऊन जिल्हा परिषदेच्या शाळा वाचवल्या पाहिजेत नाहीतर भयान वास्तव समोरील येईल की, सर्वसामान्यांची मुलं शिक्षणापासून कायमचे वंचित राहतील हे सर्व टाळण्यासाठी मराठी माध्यमाच्या शाळेतच पालकांनी प्रवेश घेतले पाहिजेत व आपल्या मुलांना तणावमुक्त शिक्षण दिले पाहिजे यातूनच अनेक उच्चपदस्थ अधिकारी घडल्याचा इतिहास आहे. असे प्रतिपादन प्रसिद्ध निवेदक तथा पत्रकार अमोल जगताप यांनी केले.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, जि. प. कें. प्रा. शा. शिराळ, ता. आष्टी येथे दि. १६ जून रोजी शाळेच्या पहिल्या दिवशी मुलांना मोफत गणवेश, पाठ्यपुस्तके तसेच शूज इत्यादी शालेय साहित्य देऊन इयत्ता पहिलीच्या वर्गात प्रवेश घेतलेल्या नवागत मुलांचे जोरदार स्वागत करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून अमोल जगताप हे बोलत होते. याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक संतोष दाणी यांनी मुलांना अनेक वेगवेगळ्या मार्गाने शिक्षणाचे महत्त्व पटवून देण्याचा प्रयत्न केला. तसेच शाळेत राबविण्यात येणारे विविध उपक्रम व शासकीय योजना याबद्दल सविस्तर माहिती देऊन विद्यार्थ्यांनी शाळेत शंभर टक्के उपस्थित राहून गुणवत्तापूर्ण शिक्षण घ्यावे व शाळेची शिस्त पाळून आपल्या शाळेचे नाव उज्वल करावे असे आवाहन केले.

या कार्यक्रमासाठी शाळेतील शिक्षक परमेश्वर जगताप, श्रीम. मंगल झगडे, राजेंद्र ढवण, सतीश शिंदे यांच्यासह पालक आजिनाथ जगताप, शरद आजबे, किरण खंडागळे आदी उपस्थित होते. यावेळी इयत्ता पहिलीच्या मुलांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. इयत्ता पहिलीच्या वर्गात दाखल झालेल्या नवीन विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करून मोफत पाठ्यपुस्तके, गणवेश व इतर साहित्याचे वाटप करण्यात आले. तसेच मुलांना प्रधानमंत्री पोषण आहार योजनेअंतर्गत स्वादिष्ट असा गोड शिरा खाऊ घालून मुलांचे स्वागत करण्यात आले. यामुळे दिवसभर मुलांच्या चेहऱ्यावरती आनंद ओसांडून वाहत होता.

## मराठवाडा साहित्य परिषदेच्या केज शाखेच्या अध्यक्षपदी

## प्रा.डॉ.नवनाथ काशिद उपाध्यक्षपदी डॉ.कविता कराड,तर सचिवपदी राहुल गदळे यांची बिनविरोध निवड



केज/प्रतिनिधी

मराठवाडा साहित्य परिषदेच्या केज शाखेच्या अध्यक्षपदी प्रा.डॉ.नवनाथ काशिद यांची तर सचिवपदी प्राचार्य राहुल गदळे, उपाध्यक्षपदीडॉ.कविता कराड,कोषाध्यक्ष पदी डॉ.बी.जे.हिरवे, कार्याध्यक्षपदी मेजर अजिमोद्दीन इनामदार, सहसचिव म्हणून विक्रम डोईफोडे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. या बिनविरोध कार्य कारणी निवडीबद्दल मसाप शाखेच्या सर्व पदाधिकारी व सदस्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.दरम्यान बाबुराव जी आडसकर महा विद्यालयातील चार जणांची या कार्यकारणी मध्ये निवड झाली आहे. साहित्यपरिषदेच्या केज शाखेतील मराठवाडा साहित्य परिषद आजीव सदस्य यांची स्थानिक कार्यकारिणी निवडी साठीची बैठक दि.१५ जून २०२५ रोजी सायंकाळी ५-०० वाजता केज येथील शासकीय विश्रामगृहात छत्रपती संभाजीनगर येथील मसापचे केंद्रीय कार्यकारणीसदस्य तथा निरीक्षक दगडू लोमटे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.नूतन पदाधिकारी यांची निवड खालील प्रमाणे करण्यात आली.केज शाखा अध्यक्ष प्रा. नवनाथ काशिद,उपाध्यक्ष डॉ.कविता कराड,कार्याध्यक्ष अजिमोद्दीन इनामदारतर सचिवपदी राहुल गदळे,सहसचिव म्हणून विक्रम डोईफोडे, कोषाध्यक्षपदी प्रा.बाबासाहेब हिरवे यांची कार्यकारणी पदाधिकारी व सदस्य निवडण्यात आले. यामध्ये अनिल गव्हाणे, बाळासाहेब लोखंडे, डॉ.सुनील राऊत, डॉ.छत्रभुज सोळंके, डॉ.हनुमंत सौदागर तरमार्गदर्शक म्हणून प्रा.ईश्वर मुंडे,जी.बी. गदळे गुरुजी व निमंत्रितामध्ये माजी शाखा अध्यक्ष श्रावणकुमार जाधव, प्रा.हनुमंत भोसले यांच्यासह सर्व माजी अध्यक्ष या प्रमाणे वरील पदाधिकारी एकमताने निवडण्यात आले.या सर्व नुतन पदाधिकाऱ्यांना संस्थापक अध्यक्ष ईश्वर मुंडे,जी.बी.गदळे यांनी शुभेच्छा दिल्या तर आभार प्रदर्शन भागवत सोनवणे यांनी केले.

## वडवणी तहसील कार्यालयाचा अजब कारभार

# अनुदानाचे पैसे दुसऱ्याच व्यक्तीच्या नावाने केले वर्ग

वडवणी (प्रतिनिधी)

वडवणी तहसील कार्यालयातील ठिसाळपणाचा नमुना समोर येत असून त्यामुळे तालुक्यातील अनेक शेतकरी त्रस्त आहेत. शासनाने दिलेल्या अनुदानाचा पैसा वडवणी तहसील कार्यालयातील कारभारामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांचा पैसा दुसऱ्याच्या नावाने जमा करण्यात आला आहे. अनुदानाची रक्कम मागील अनेक महिन्यापासून मिळत नसल्यामुळे वडवणी तालुक्यातील अनेक शेतकरी त्रस्त झाले आहेत. याबाबत सखोल चौकशी करून तहसील कार्यालयातील कारभारावर लक्ष केंद्रित करावे अशी मागणी शेतकऱ्यांनी केले आहे.

वडवणी तालुक्यातील पिंपरखेड येथील शेतकरी गोरख एकनाथ ढगे यांच्या नावाने शासनाने दुष्काळी अनुदान पाठविलेले आहे. सदर अनुदान सन २०२३ २४ चे असून हे अनुदान अद्यापही गोरख ढगे यांना मिळालेले नाही. सदर अनुदान दिनांक १३ ऑक्टोबर २०२४ रोजी गोरख एकनाथ ढगे यांच्या नावाने जमा न होता बीड तालुक्यातील एका शेतकऱ्याच्या नावाने



जमा झाली आहे. त्यामुळे गोरख ढगे यांना अद्यापही अनुदान मिळाले नाही. याबाबत ढगे यांनी वडवणी तहसील कार्यालयाला अनेक वेळा अर्ज निवेदन दिले व अनेक चकरा मारल्या. मात्र अद्यापही त्यांचा प्रश्न सोडविण्यात आलेला नाही. याबाबत तहसील कार्यालयाने वेळीच दखल घ्यावी आणि अनुदानाची रक्कम तत्काळ देण्यात यावी अशी मागणी गोरख ढगे यांनी केली आहे. गोरख ढगे यांच्यासह तालुक्यातील असे अनेक शेतकऱ्यांचे पैसे दुसऱ्याच्या नावाने जमा झाले आहेत.

### नेमका घोळ काय

वडवणी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या नावावर आलेले पैसे इतर दुसऱ्याच व्यक्तीच्या नावाने नेमके जमा कसे झाले..? यामध्ये नेमकं काय गौड बंगाल आहे. याचा सविस्तर शोध व्हावा आणि याबाबत दोषी असणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यावर कडक कारवाई व्हावी अशी मागणी आता शेतकऱ्यांमधून होत आहे.

### तहसील प्रशासनाने केला बँकेशी पत्रव्यवहार

शेतकऱ्यांचे पैसे चुकून दुसऱ्याच नावाने जमा झाल्यानंतर ज्या व्यक्तीच्या नावाने पैसे जमा झाले आहेत आणि ज्या बँकेत पैसे जमा झाले आहेत त्या बँकेला वडवणी तहसील कार्यालयाच्या वतीने पत्रव्यवहार करण्यात आला आहे. पत्रव्यवहार करून सदर पैसे वापस जमा करावेत व त्या व्यक्तीच्या नावाला होल्ड करण्यात यावा अशा पद्धतीच्या सूचना तहसील प्रशासनाने बँकेला केलेली आहे.

## शुभांगी शिंदे हुंडाबळी प्रकरणातील फरार आरोपीला अटक करून सर्व

# दोषींना फाशीची शिक्षा देण्याची सजग अंबाजोगाईकरांची मागणी

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

अंबाजोगाई तालुक्यातील गित्ता येथील शुभांगी शिंदे हुंडाबळी प्रकरणातील राजकिय वरदहस्त असलेल्या फरार आरोपीस तात्काळ अटक करून सर्व आरोपींना फाशीची शिक्षा द्यावी. जेणेकरून समाजात अन्य कोणीही हुंडा घेणे किंवा देणे या प्रकारास आळा बसेल या प्रकारच्या मागणीचे निवेदन सजग अंबाजोगाईकरांच्या वतीने उपजिल्हाधिकारी दीपक वजाळे यांना दिले आहे.सदरील निवेदन देतांना सजग अंबाजोगाईकर म्हणून मनस्विनी महिला प्रकल्पाच्या अरुंधती लोहिया, इंडियन मेडिकल असोसिएशनचे राज्य सहसचिव डॉ राजेश इंगोले रोटरी क्लबचे धनराज सोळंके, इनरव्हील क्लबच्या श्रीमती सुरेखा शिरसाट खंडाळे मॅडम, डॉ नरेंद्र काळे, साहीत्य परिषदेचे डॉ धाकडे, शिक्षक मैत्री प्रतिष्ठाणचे अध्यक्ष विजय रापतवार , अनंत जगातकर, भीमाशंकर शिंदे, पीडिता शुभांगी शिंदे यांचा भाऊ प्रदीप साळुंके यांच्यासह अंबाजोगाई तालुक्यातील जेष्ठ नागरिक संघाचे ऍड अनंत जगतकर, पद्माकर सेलमोहकर ,आशा हबीब, डॉ दिलीप खेडगिकर यांच्यासह शहरातील विविध शाळातील अनेक विद्यार्थिनी , शिक्षक तथा शिक्षिका,पत्रकार, डॉक्टर्स, प्राध्यापक यांच्यासह अनेक संवेदनशील अंबाजोगाईकर सहभागी झाले होते.

एकेकाळी पुरोगामी महाराष्ट्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आपल्या राज्यात सातत्याने अमानुष घटनांची नोंद होत आहे. मागील




काही दिवसात महाराष्ट्रभर गाजत असलेल्या वैष्णवी हगवणे हीस हुंड्यासाठी छळ करून आत्महत्येस प्रवृत्त केल्याचे प्रकरण गाजत असतानाच अंबाजोगाई तालुक्यात हुंडाबळीची अशीच एक घटना घडल्याचे निदर्शनास आले आहे. धारूर येथील मोहखेड माहेर असलेली शुभांगी संतोष शिंदे या उच्चशिक्षित विवाहितेस हुंड्यासाठी छळ करून आत्महत्येस प्रवृत्त केल्याची घटना नुकतीच घडली आहे. शुभांगी चा विवाह गीत्ता गावच्या संतोष शिंदे यांच्याशी २०२२ मध्ये संपन्न झाला. त्यावेळी वर पक्षाकडनं केलेल्या मागणीनुसार हुंडा दिलेला असताना सतत पैशाची मागणी केली जात होती. माहेरून पैसे घेऊन ये असा दबाव तिच्यावर आणून तिचा शारीरिक आणि मानसिक छळ केला जात होता. शुभांगीचा मृत्यू हा संशयास्पद आहे. अशा आशयाची फिर्यादही तिच्या भावाने पोलिसांमध्ये केलेली आहे. हुंडा प्रतिबंध अधिनियम १९६२ लागू होऊन देखील आजही सर्व जाती-धर्मामध्ये मोठ्या प्रमाणात हुंडा घेतला जातो आणि त्याचाच परिणाम महिला व मुलांच्या शोषणामध्ये होतांना दिसून येतो. बालविवाह, कौटुंबिक हिंसा आणि बाल लैंगिक अत्याचार या समस्यांना हुंडा ही सामाजिक कूप्रथा अनेकदृष्टीने कारणीभूत आहे. या कूप्रथेंचा वापर करून नवविवाहितांचा छळ करणाऱ्या व्यक्ती आणि कुटुंबाचा तीव्र निषेध करत असल्याचे आणि पीडितेच्या कुटुंबियांच्या पाठीशी समस्त जागृत समाज आहे हा विश्वास त्यांना मिळावा आणि यापुढील घटनांना चाप बसावा याकरिता हे आंदोलन असल्याचे आपल्या निवेदनाद्वारे सजग अंबाजोगाई करांनी सांगितले. यावेळी प्रा अरुंधती पाटील, डॉ राजेश इंगोले यांच्यासह अनेकांनी आपली मनोगत व्यक्त करत शुभांगी शिंदे तसेच वैष्णवी हगवणे यांना श्रद्धांजली अर्पण करत सर्व आरोपींना फाशीची शिक्षा द्यावी अशी मागणी उपजिल्हाधिकारी यांच्याकडे सादर केली.

## शब्दगंधच्या पत्रलेखन स्पर्धेत जनता विद्यालयाचा शायान नईम शेख उत्तेजनार्थ

आष्टी (प्रतिनिधी)

शब्दगंध साहित्यिक परिषद अहिल्यानगर आयोजित पत्रलेखन स्पर्धेत जनता माध्यमिक विद्यालय धानोरा येथील विद्यार्थी शायान नईम शेख या



सहावीच्या विद्यार्थ्याने चतुर्थ उत्तेजनार्थ क्रमांक मिळवला आहे.पत्रलेखन स्पर्धा शब्दगंध साहित्यिक परिषदने आयोजित केलेला स्तूत्य उपक्रम आहे. शनिवार दिनांक २१ जून २०२५ रोजी ४ वाजता कोहिनूर मंगल कार्यालय अहिल्यानर येथे बक्षीस वितरण मान्यवरांच्या हस्ते होणार आहे. या यशासाठी स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र आणि पुस्तक भेट मिळणार आहे. शायानचे या यशासाठी शब्दगंधचे अध्यक्ष राजेंद्र उदागे, सुनील गोसावी सर, शर्मिला गोसावी मॅडम, जनता विद्यालयाचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षक - शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच समीर सय्यद सर यांनी अभिनंदन केले आहे.

# नांदूरघाट ग्रामीण रुग्णालयात चमत्कार ! रुग्णालयात अवतरले चक्क अंतर्ज्ञानी डॉक्टर!

केज (प्रतिनिधी)

आजच्या घडीलाग्रामीण भागात नौकरी मिळणे म्हणजे नशीब लागते कारण कोणत्याही विभागात असो या ठिकाणी नौकरी करणारे नोकरदार म्हणजे आताचे राजेचं म्हटलं तर वावगं ठरणार नाही.कारण या ठिकाणी कोणता अधिकारी,कर्मचारी कुठे,केंव्हा आणि कशी नौकरी करतो हे त्यालाच माहित त्यांना त्यांच्या वरिष्ठांकडून कधी विचारणा होते की नाही ? हा प्रश्न सध्या उपस्थित होत आहे. त्यातच ग्रामीण भागातील डॉक्टर तर स्वतःला आजचे राजेचं समजत आहेत.एवढेच नव्हे तर नांदूरघाट ग्रामीण रुग्णालयात तर चक्क अंतर्ज्ञानी डॉक्टर अवतरले असुन ते रुग्णांची तपासणी हात न लावता फक्त दहाफुट अंतरावरून पाहुनच करत आहेत.त्यामुळे अशा अंतर्ज्ञानी डॉक्टर महाशयामुळे रुग्ण ठणठणीत बरे होत आहेत.मात्र अशा अंतर्ज्ञानी डॉक्टरांची वरिष्ठांनी तात्काळ दखल घेणे गरजेचे असुन त्यांना ग्रामीण भागातील रुग्णांची सेवा करण्यापेक्षा शहरातील रुग्णालयात पाठवले तर त्यांचे ज्ञान आणखी वाढेल.

या बाबतची सविस्तर माहिती अशी की,सध्या ग्रामीण भागातील शासकीय रुग्णालयात कर्तव्यावर असलेले डॉक्टर हे रुग्णांना कशी सेवा देतात ही बाब त्यांचे वरिष्ठ कधी पाहतात की नाही ? हे शंकास्पद आहे.या ठिकाणी नौकरीकरणारे डॉक्टर यांना शासन जनतेच्या सेवेसाठी महिण्याकाठी लाखो रुपये पगार देत आहे. परंतु हे त्या डॉक्टरांच्या कधी लक्षात आलेच नाही हे पैसे आपल्याला रुग्नांची सेवा करण्या साठी दिले जात आहेत. या उलट आपण केलेली मेहनत घेतलेले परिश्रम यांचा मोबदलाहक्काचा आपल्याला मिळत असल्याचा भ्रम या डॉक्टर महाशयांना वाटत असावा.ते रुग्ण सेवेला कधीच महत्त्व देत नाहीत.

सध्या केजतालुक्यातील नांदूरघाट ग्रामीण रुग्णालयात तर चक्क अंतर्ज्ञानी डॉक्टरांची नेमणूक शासनाने केले असल्याचे




चित्र दिसून येत आहे.त्यांचे झाले असे की,दि.१५ जुन २०२५ रोजी सायंकाळी ५-०० वाजता दैनिक लोकनायकचे केज तालुका प्रतिनिधी पत्रकार महादेव काळे हे त्यांच्या पत्नीआजारी असल्याने त्यांना घेवुन नांदूरघाट ग्रामीण रुग्णालयात घेवुन गेले त्या ठिकाणी कर्तव्यावर असलेले डॉक्टर मनसुके हे आपल्या खोलीत आराम करत होते.शिपायांनी त्यांना बोलावून आणले.त्या वेळी देखिल ते पंधरा मिनिटांनी आले ते आल्यानंतर ते त्यांच्या रुग्णांना तपासण्यासाठी जी खोली असते त्या खोलीत न जाता ते थेट इंजेक्शन रुममध्ये गेले व त्या ठिकाणी एक परिचारीकाही उपस्थित होत्या.मनसुके या डॉक्टरांनी पत्रकार महादेव काळे व त्यांच्या पत्नीला या ठिकाणी बोलावून घेतले आणि दहा फुट लांब उभा राहुन विचारले काय बोला...त्यांना आजारा विषयी माहिती सांगितल्या नंतर त्याच ठिकाणाहून त्यांनी परिचारिका यांनागोळ्या देण्यास सांगितल्या त्यावर पत्रकार महादेव काळे यांनी म्हटले की, साहेब माझ्या पेशंटला तपासून पहा.मगऔषध द्या त्यावर डॉक्टर म्हणाले की मी ईथुनच पाहिले आहे.यावर पत्रकार महादेव काळे यांनी डॉक्टरांना विनंती केली की डॉक्टर साहेब माझी पत्नी तापाने फणफणत आहे.तिला तपासणी करुन औषध उपचार करा.त्यावर डॉक्टर म्हणाले की, तुम्ही पहिले बाहेरव्हा... मी मेडीकल ऑफिसर आहे.चला व्हा बाहेर. मी बीड सिव्हिल ला ड्युटी केली आहे.काय द्यायचं हे मला चांगले माहीत आहे.पत्रकार महादेव काळे मात्र त्यांनी दिलेल्या चार गोळ्या घेवून तापाने फणफणत असलेल्या पत्नीला घरी घेवुन गेले. या गोष्टींवरुन एक गोष्ट मग नक्की स्पष्ट होते ती म्हणजे की,नांदूरघाट ग्रामीण रुग्णालयात कर्तव्यावर असलेले डॉक्टर मनसुके हे साधे सुधे डॉक्टर नसुन ते अंतर्ज्ञानी डॉक्टरआहेत. त्यांचेकडे रुग्णालयात आलेल्या रुग्णांना काय आजार आहे.किंवा त्यांना काय होतेय हे त्यांना अगदी १० फुटां वरून कळतेय.त्यामुळे अशा कर्तव्यदक्ष डॉक्टरांना मा.जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी या ग्रामीण भागात न ठेवता त्यांना शहरातील रुग्णालयात ठेवावे कारण त्या रुग्णालयात जास्त प्रमाणात रुग्ण येतात.किंवा या डॉक्टर महाशयांवर क्रॉस व्हिजिट देवुन माहिती घ्यावी.अशा सर्व सामान्य जनतेतुन प्रतिक्रिया येत आहेत.

# विद्यार्थ्यांनी आई वडिलांचे स्वप्ने पूर्ण करावीत - डॉ.हनुमंत सौदागर

## केज येथील जिल्हा परिषदेच्या उर्दू शाळे तील मुलांना गणवेश व पुस्तकांचे वाटप

केज (प्रतिनिधी)

**आपण करत असलेली कष्टाची कामे आपल्या मुलांच्या नशिबी येऊ नयेत त्याने उच्चशिक्षित व्हावे असे स्वप्न प्रत्येक मुलांचे आई वडील पाहत असतात त्यामुळे विद्यार्थ्यांनी आपल्या आई वडिलांनी पाहिलेली स्वप्ने उच्च शिक्षित होऊन पूर्ण करावीत यासाठी विद्यार्थ्यांना दररोज शाळेत आपली उपस्थिती लावणे गरजेचे आहे तसेच शाळेत एखाद्या विषयाचा प्रश्न समजला नाही तर तो परत शिक्षकाकडून समजून घेण्यासाठी कसलाही संकोच करू नये, जीवनात यशस्वी होण्यासाठी प्राथमिक शिक्षण हे खूप महत्वाचे असल्याने विद्यार्थ्यांनी शाळेतून दिलेला गृहपाठ हि करणे गरजेचे असल्याचे मत भाऊसाहेब पाटील अद्यापक महा विद्यालयाचे प्रा.डॉ. हनुमंत सौदागर यांनी केज शहरातील अजिजपुरा येथील जिल्हा परिषदेच्या उर्दू शाळेत शाळेच्या पहिल्याच दिवशी नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत व पुस्तक वाटप कार्यक्रमात मार्गदर्शन करताना केले.**

केजशहरातील शुक्रवार पेठेतील अजिजपुरा येथील जिल्हा परिषदेच्या उर्दू प्राथमिक शाळेत शाळेच्या पहिल्याच दिवशी शाळे मध्ये इयत्ता पहिलीच्या वर्गात प्रवेश घेतलेल्या नवागत विद्यार्थ्यांचे स्वागतासह विद्यार्थ्यांना पुस्तक वाटप,गणवेश वाटप व शूज व सॉक्स वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमास भाऊसाहेब पाटील अद्यापक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.हनुमंत सौदागर, पत्रकार दीपक नाईकवाडे,शालेय समितीचे अध्यक्ष शेख बाबर रशीद,उपाध्यक्ष शेख मोहंमद तय्यब, शेख शाहेद,शेख अन्वरभाई ,सौ.सुमय्या मुंडे,सौ,मणियार तस्लिम आदींची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी शाळेत प्रवेश घेतलेल्या नवागत विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आल्या नंतर उपस्थित विद्यार्थ्यांना शालेय साहित्यासह पुस्तक वाटप,गणवेश व शूज व सॉक्स यांचे वाटप उपस्थित प्रमुख पाहुण्याच्या हस्ते करण्यात आले तसेच यावेळी विद्यार्थ्यांना खेळातून शिक्षण व नवीन अभ्यासक्रमाची माहिती शाळेच्या शिक्षकांनी दिली. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना भाऊसाहेब पाटील अध्यापक महा विद्यालयाचे प्राचार्य डॉ. हनुमंत




सौदागर यांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्व विषद करून सांगताना आयुष्यात शिक्षण किती महत्वाचे आहे हे पटवून देत उच्च शिक्षण घेण्यासाठी प्राथमिक शिक्षणाचा पाया मजबूत असला पाहिजे व हा प्राथमिक शिक्षणाचा पाया मजबूत करण्यासाठी विद्यार्थ्यांनी शिक्षकांनी शाळेत शिकवलेले ज्ञान समजून घेणे गरजेचे आहे तसेच विद्यार्थ्यांना एखाद्या विषयाच्या धड्यातील प्रश्न जर समजला नसेल तर तो त्यांनी परत त्या विषया च्या शिक्षकाकडून समजून घेतला पाहिजे, शाळेत मुलांना पाठवताना आईवडील मोठे स्वप्न पाहत असतात ते साकार करण्याचे काम विद्यार्थ्यांनी शाळेत शिकून केले पाहिजे असे मत यावेळी डॉ. हनुमंत सौदागर यांनी व्यक्त केले.यावेळी शाळेच्यामुख्याध्यापिका शेख सलमा हमीद, शाळेचे शिक्षक शेख मोहमद इंमतीयास, शाह अन्सार,दायमी नुरुस्सबा आदीउपस्थित होते या कार्यक्रमाचे सूत्र संचालन शाळेचे शिक्षक कमठाणे फारुख मकबूल यांनी केले.

# तहसिलदार वैशाली पाटील यांच्या लेखी आश्वासनाने अशोक साळवे यांचे उपोषण मागे

आष्टी (प्रतिनिधी)

आष्टी तालुक्यातील अनेक गोरगरीब निराधार, दिव्यांग लाभार्थी हे गेले सहा महिन्यापासुन संजय गांधी निराधार, श्रावणबाळ योजनेचे रमाई घरकूल, पंतप्रधान घरकुल योजनेचे मानधन व निधीपासुन वंचीत आहेत. त्या लोकांवर उपसमारीची वेळ आलेले आहे. पंचायत समितीमध्ये घरकुल धारकांना सहा महिन्यापासुन हप्ता दिला गेला नाही. आष्टी पंचायत समितीमधील घरकुल विभागातील कर्मचारी व अधिकारी हाताकडे पाहतात. त्यांचा बंदोबस्त करण्यात यावा. गरीबांची आर्थिक पिळवणूक करणाऱ्यांवर कारवाई व्हावी तसेच तहसिलदार यांनी गटविकास अधिकारी यांना घरकुलांचे पैसे देण्याचा आदेश द्यावा, या व इतर मागण्यासाठी मंगळवार दि. १७ जुन रोजी तहसिल कार्यालयासमोर रिपाइं आठवले गट तालुकाध्यक्ष अशोक साळवे यांनी उपोषण सुरु केले होते. तहसिलदार यांनी उपोषण कर्त्याच्या मागण्या संबंधित वरिष्ठ अधिकारी यांच्याकडे पाठविल्या. लवकरच या मागण्या पुर्ण होतील. तहसिलदार वैशाली पाटील यांनी दिलेल्या लेखी पत्रात म्हटले आहे की, विशेष सहाय योजनेच्या लाभार्थ्यांना शासनाचे डीबीटी धोरणानुसार अनुदान शासन स्तरावरुन वितरीत करण्यात येते.षशासन निर्णय २० ऑगस्ट २०१९ नुसार विशेष सहाय योजनेच्या लाभ घेण्यासाठी आधार कार्ड सक्तीचे केले आहे. आधार कार्डद्वारे शासन स्तरावरुन थेट लाभ हस्तांतरण करण्यात येत आहे. ज्या लाभार्थ्यांची माहिती आधारसह शासनाचे डीबीटी पोर्टलवर पडताळणी पूर्ण झाली अशा लाभार्थ्यांना शासन स्तरावरुन डीबीटीद्वारे अनुदान वितरीत करण्यात




येत आहे. उर्वरीत लाभार्थ्यांची माहिती तलाठीस्तरावरुन संकलित करुन शासनाचे डीबीटी पोर्टलवर भरण्यावी प्रक्रिया सुरु आहे. ज्या लाभार्थ्यांना अनुदान मिळत नाही अशा लाभार्थ्यांना त्वरीत तलाठी कार्यालयात आपले कागदपत्रे जमा करणेबाबत या कार्यालयाकडून वेळोवेळी प्रसिध्दी पत्रकाद्वारे लाभार्थ्यांना कळविण्यात आलेले आहे. ज्या लाभार्थीचे आवश्यक कागदपत्रे या कार्यालयास प्राप्त झाले अशा लाभार्थ्यांना शासन स्तरावरुन अनुदान वितरीत होत आहे. उर्वरित लाभार्थ्यांची माहिती ऑनलाईन झालेनंतर त्याही लाभार्थ्यांना अनुदान वितरीत होणार आहे म्हणून उपोषण न करता उपोषणापासून परावृत्त व्हावे अशी विनंती केली आहे. यावेळी अव्वल कारकुन (शासन) भगीरथ धारक, पंचायत समितीचे अजय निंबाळकर, चव्हाण, रविंद्र ढोबळे, सचिन बाप्पा गोंदकर यांच्या मध्यस्थितीने हे उपोषण सुटले. तालुकाध्यक्ष अशोक साळवे यांनी उपोषण मागे घेतले आहे. या उपोषणात तालुकाध्यक्ष अशोक साळवे, पँथर संभु साळवे, शांताराम जोगदंड, बाबासाहेब गायकवाड, पंढरीनाथ साबळे, रतन जाधव, युवराज साळवे, साखरबाई त्रिबक पाचपुते, कमल गोरख ससे, शिवबाई बन्शी काकडे, राधाबाई पोपट शिंदे, इंदुबाई बापु कदम, गयाबाई विनायक खंडागळे, लिलाबाई बाळु पवार, मालनबाई अंबादास धोत्रे, आयशा शिराज सय्यद, शिंदु अशोक निंबाळकर, सत्यभामा सुदाम जामदाडे, सुनिता बाळु जाधव, मंगल कचरु शिरोळे, गिता शिवाजी पवळ यांनी सहभाग घेतला होता.

# समाजसेवक विजयकुमार गोल्हार यांच्याकडून आर्थिक मदतीचा हात

## कापसी ग्रामस्थांकडून विशेष आभार

आष्टी (प्रतिनिधी)

आष्टी तालुक्यात तिन - चार दिवसापूर्वी वादळी वाऱ्यासह पाऊस पडला होता. या पावसामुळे अनेक ठिकाणी शेतीचे व घरांचे नुकसान झाले होते. असेच नुकसान कापसी येथील गोल्हार कुटुंबीयांचे झाले होते. घरावरील पत्र्याचे छत वादळी वाऱ्यामुळे उडून गेले होते. या घटनेत एक महिला गंभीर जखमी झाली होती. या कुटुंबियांची समाजसेवक विजयकुमार गोल्हार यांनी भेट घेऊन त्यांना आर्थिक मदतीचा हातभार लावला.

चार दिवसापूर्वी झालेल्या वादळी वारे आणि पावसामुळे आष्टी तालुक्यातील बहुतांश शेतकऱ्यांचे घरे आणि शेतातील फळबागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. यावेळी मौजे कापसी, तालुका आष्टी, जिल्हा



बीड येथील कुसुम महादेव गोल्हार व गणेश महादेव गोल्हार यांचं संपूर्ण घर वाऱ्याने उडून गेले व कुसुमबाई ह्या गंभीर जखमी झाल्या होत्या. या कुटुंबाला अनेक राजकीय नेत्यांनी भेटी दिल्या पण एकानेही आर्थिक मदत केली नाही. गोरगरिबांची जाण असणारे व गरिबांचा आधार असणारे नेतृत्व समाजसेवक विजयकुमार (भाऊ) गोल्हार यांनी ह्या कुटुंबाला रोख स्वरूपात आर्थिक मदत करून मदतीचा आधार दिला. त्याबद्दल सर्व गावकऱ्यांकडून समाजसेवक मा. जि. प. सदस्य विजयकुमार गोल्हार यांचे कौतुक करून आभार मानले जात आहेत.



## परमपूज्य संत बाळूमामा पालखी क्र. ०३ कदमवस्ती येथे

# महाप्रसादाचा आनंद घेण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित रहाण्याचे आव्हान

वडवणी (प्रतिनिधी)


परमपूज्य संत बाळूमामा पालखी क्र.०३ कदमवस्ती वडवणी येथे दि.१५/०६/२०२५ रोजी आली असता भावीक देखील बाळुमामाच दर्शन घेण्यासाठी व मेढ्या पाहाण्याची उत्सुकतेने मोठ्या संख्येने उपस्थित राहत आहेत. परमपूज्य संत बाळूमामा पालखी ही भक्तांसाठी फक्त एक धार्मिक परंपरा असून आध्यात्मिक मार्गदर्शन करणारी यात्रा आहे. भक्ती, कीर्तन, नामस्मरण यांद्वारे भाविकांच्या मनात श्रद्धा व अध्यात्म जागवते,हा पालखी सोहळा, लोकांना एकत्र आणते. परमपूज्य संत, बाळूमामांचा संदेश सर्वसमावेशक आहे, त्यामुळे विविध समाजघटक या पालखीत सहभागी होतात.

# सौ.सुमनताई व श्री.विक्रम पोकळे यांची शतकपुर्ती थाटात साजरी व्हावी - ह.भ.प.बबन महाराज बहिरवाल

आष्टी (प्रतिनिधी)

बीड जि. प. चे माजी शिक्षणाधिकारी विक्रम पोकळे व सौ. सुमनताई पोकळे यांच्या लग्नाचा सुवर्णमहोत्सवी वाढदिवस थाटात झाला. आता या दोघांचा शतकपुर्ती सोहळा ही आपण थाटात साजरा करु. पोकळे सर व त्यांचे मोठे बंधु का. नानासाहेब पोकळे यांनी कुटुंबातील सर्व सदस्य उच्चशिक्षीत व उच्चपदस्थ केलेले आहेत. जावई, पुतणे, मुलगा, सुना हे मोठ मोठ्या पदावर कार्यरतआहेत. त्यांनी डिवायएसपी, कृषी संचालक, शिक्षक, शिक्षीका, वकील आदी घडविले आहेत. त्यामुळे सौ. सुमनताई व विक्रम पोकळे यांची शतकपुर्ती थाटात साजरी व्हावी असे प्रतिपादन ह. भ. प. बबन महाराज बहिरवाल यांनी केले. बीड जि. प. चे माजी शिक्षणाधिकारी विक्रम पोकळे यांचा सुवर्णमहोत्सवी लग्नवाढदिवसाच्या कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी ह. भ. प. बबन महाराज बहिरवाल, ह. भ. प. दादा महाराज चांगुणे, सेवानिवृत शिक्षण संचालक दिनकर टेमकर, अरुण धामणे, लक्ष्मण पोले, भगवान सोनवणे,



आनंद खेडकर, शिवाजी शिंदे, दत्ताभाऊ काकडे, संतोषशेठ मेहेर, डा. अशोक गांधी, जय देशमुख, नामदेव राऊत, रामराव झांजे, प्रल्हाद पोकळे, सुधीर पोकळे, स्वानंद थोरवे, उत्तम बोडखे, सुभाष रासकर, पोपट घुले, प्रा. डा. शाम सांगळे, शिवाजी कर्डीले, नवीन कासवा, नवनाथ विधाते, पी. वाय. काळे, संपत धोंडे, तान्हाजी भगत, दिलीप पोकळे, सिध्देश्वर शेंडगे, राजेंद्र लाड, प्रा. अमृत पोकळे, सरपंच सजय थोरवे, सरपंच अर्चना मनोज थोरवे, बलभीम थोरवे महाराज, बाळासाहेब शेंदुरकर आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी पत्रकार तथा उपसंपादक उत्तम बोडखे म्हणाले की, विक्रम पोकळे सर हे एक आगळे वेगळे रसायन आहे. माणुसकी, श्रमप्रतिष्ठा, चांगुलपणा, सत्य, कष्ट, प्रामाणिकपणा ही मूल्य जपणारे ते व्यक्तिमत्व आहे. विक्रम पोकळे साहेबांशी माझा असलेला सहवास हे माझे भाग्य आहे. यावेळी त्यांच्या विविध अंगी व्यक्तिमत्त्वावर संक्षिप्त प्रकाश टाकला. विक्रम पोकळे यांनी शिक्षण अधिकारी पदावर असताना जनसामान्यांच्या सेवेत आदरभाव ठेवला. शिक्षण क्षेत्राची मनोभावे सेवा केली. या काळात त्यांनी अनेक वरिष्ठ अधिकाऱ्यांशी अत्यंत स्नेहाचे संबंध ठेवले हे संबंध आजही कायम असल्याचे सांगून अनेक उदाहरणे त्यांनी दिले. बीड जिल्हा परिषदेचे माजी शिक्षणाधिकारी विक्रम पोकळे यांचा लग्न वाढदिवसाच्या निमित्ताने मित्रवर्य आणि नातेवाईकांसाठी स्नेहभोजनाचे आयोजन करून कार्यक्रम आयोजित केला होता. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांनी शुभेच्छा देऊन सत्कार केला. दरम्यान विक्रम पोकळे यांच्या कुटुंबीयांना सुख, समृद्धी, आनंद आणि दीर्घायुष्य लाभावे अशी प्रार्थना करून त्यांनी उभयतांना शुभेच्छा दिल्या. यावेळी अमित पोकळे, ह. भ. प. दादा महाराज चांगुणे, सरपंच परिषदेचे प्रदेशाध्यक्ष दत्ताभाऊ काकडे, माजी सरपंच नामदेव राऊत, सुधीर पोकळे, प्रल्हाद पोकळे, स्वानंद थोरवे यांनी मनोगत व्यक्त करुन शुभेच्छा दिल्या. सुत्रसंचलन स्वानंद थोरवे तर आभार अमित पोकळे यांनी मानले.

# हनुमानवाडी येथील तुपे वस्तीवर सशस्त्र दरोडा

## महिलेच्या गळ्यातील दागिने ओरबडले-पतीच्या डोक्यात धारदार शस्त्राने वार

शिरूर (प्रतिनिधी)

तालुक्यातील मानूर जवळील हनुमानवाडी येथील तुपे वस्तीवर सोमवारी मध्यरात्री एक ते दीड वाजण्याच्या दरम्यान चोरांनी दरोडा टाकून पती पत्नीला मारहाण केल्याची घटना घडली आहे.या घटनेत भागवत तुपे यांच्या डोक्यात धारदार शस्त्राने वार करण्यात आला असून त्यांना अहिल्यानगर येथील खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.सोमवारी मध्यरात्री एक ते दीड वाजण्याच्या दरम्यान तीन चोरांनी तुपे वस्तीवरील आजुबाजूच्या घरांना बाहेरून कड्या लावून भागवत तुपे यांच्या घराचे दार तोडून आत प्रवेश केला.या वेळी भागवत तुपे यांच्या पत्नी



सरस्वती यांचे तोंड दाबून गळ्यातील मंगळसूत्र काढले.तसेच बाजूला झोपलेले पती भागवत तुपे हे जागे झाल्यामुळे त्यांच्या डोक्यात धारदार शस्त्राने वार करून डोके फोडले.तसेच सरस्वती यांच्या पाकिटातील रोख दहा हजार रुपये आणि गळ्यातील तसेच घरात ठेवलेले दोन तोळ्याचे दागिने घेऊन चोरटे पसार झाले आहेत.या प्रकरणी शिरूर पोलिसांत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून सहपोलीस निरीक्षक प्रविण जाधव यांच्यासह पोलिस उपनिरीक्षक धनंजय कुलकर्णी,देवीदास खांडकुळे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली आहे.

सहपोलीस निरीक्षक जाधव यांची तत्परतापंधरा दिवसांपूर्वी रुजू झालेले सहपोलीस निरीक्षक प्रविण जाधव यांना घटनेची माहिती कळताच त्यांनी आपल्या कर्मचाऱ्यांसह घटनास्थळी भेट दिली.तसेच दरोडेखोरांच्या हल्ल्यात जखमी झालेले भागवत तुपे यांना प्राथमिक उपचारासाठी ज्या दवाखान्यात दाखल केले होते त्या दवाखान्यात जाऊन तुपे यांची भेट घेऊन घटनेची माहिती घेतली आणि तुपे कुटुंबाला धीर देण्याचे काम केले.

तपास वेगाने सुरू

हनुमानवाडी येथे घडलेल्या घटनेप्रकरणी तपासाची चक्रे वेगाने फिरविण्यात आली असून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने देखील भेट दिली आहे.श्वान पथक आणि ठसे तज्ञांना तपासासाठी पाचारण करण्यात आले असून लवकरच या प्रकरणाचा छडा लावण्यात येईल. प्रविण जाधव - सहपोलीस निरीक्षक,शिरूर कासार-

# महाराणी ताराबाई विद्यालयात प्रवेशोत्सव उत्साहात साजरा

वडवणी।प्रतिनिधी

वडवणी येथील, महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये सोमवार दि.१६ जून २०२५ रोजी नवीन शैक्षणिक वर्ष-२०२५-२६ च्या पहिल्या दिवशी प्रवेशोत्सव,पुस्तक दिन,वृक्षारोपण कार्यक्रम विद्यालयात आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्कार शिक्षण मंडळाचे संस्थापक,सचिव तथा मा.आ.केशवराव आंधळे तर प्रमुख अतिथी म्हणून विद्यालयाच्या शालेय समितीचे अध्यक्ष तथा युवा नेते संजयभाऊ आंधळे तसेच विद्यालयाच्या नवनियुक्त मुख्याध्यापिका श्रीमती शोभाताई आंधळे-डोईफोडे,उपमुख्याध्यापक मस्के सर,पर्यवेक्षक धाईतिडक सर, श्री.डोईफोडे सर,श्री.कुलकर्णी सर आदींजन मान्यवर म्हणून उपस्थित होते.

मा.आ.केशवराव आंधळे यांच्या शुभहस्ते पहिल्या दिवशी शाळेत



आलेल्या विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले व कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी तथा शालेय समितीचे अध्यक्ष संजयभाऊ आंधळे तसेच मान्यवरांच्या शुभहस्ते पाठ्यपुस्तके विद्यार्थ्यांना मोफत वाटप करण्यात आले त्यानंतर एक पेड माँ के नाम या उपक्रमांतर्गत विद्यालयाच्या नवनियुक्त मुख्याध्यापिका श्रीमती शोभाताई आंधळे-डोईफोडे मॅडम यांच्या हस्ते विद्यालयाच्या प्रारंगणामध्ये वृक्षारोपण करण्यात आले याप्रसंगी प्रवेशोत्सव समिती कक्षाचे प्रमुख श्री.कुलकर्णी एस.ए.तसेच उपप्रमुख श्री.घोळवे डी.के.व सदस्या श्रीमती घुले व्ही.एम.,श्री.चोले सर,श्री.प्रदीपजी काळे सर,श्री.डमरे टी.व्ही.,श्री.कनाके डी.सी.,प्रा.राहुलजी कांबळे,प्रा.अंडील जी.पी.,प्रा.संजयजी केदार यांच्यासह विद्यालयातील विद्यार्थी तसेच शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पत्रकार बाळकृष्ण मंगरूळकर यांना मातृशोक

शिरूर कासार

शिरूर कासार येथिल पत्रकार बाळकृष्ण मंगरुळकर यांच्या मातोश्री रुखमीन सीताराम मंगरुळकरयांचे मंगळवार(दि.१७)रोजी पहाटे ०५:०७ वाजता वृध्दापकाळाने निधन झाले , त्यांचे मृत्यू समयी ७५ वर्ष



ईतके होते .त्यांचा अंत्यविधी सकाळी ११:३० वा. शिरूर कासार येथील अमरधाम स्मशानभुमिवर अंत्यसंस्कार करण्यात आले .त्यांचे पश्चात दोन मुले, सुन , नातू असा मोठा परिवार आहे .त्या शांत व संयमी व धार्मिक वृत्तीच्या असून त्यांच्या जाण्याने मंगरूळकर कुटुंबावर दुःखद प्रसंग असून त्यांच्या दुःखात मित्र आप्तेष्ट, नातवाईक, सहभागी आहेत.

# कुंबेफळ येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत वटवृक्षावर आपल्या हाताचा ठसा उमटवून झाला विद्यार्थ्यांचा प्रवेश

## ग्रामीण विद्यार्थी गुणवत्ता आणि मेहनतीच्या बळावर यशस्वी होतात - अक्षय मुंदडा

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कुंबेफळ येथे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चा नवागतांचा प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरूवात प्रभात फेरीने करण्यात आली. पहिलीतील नवागतांचे ट्रॅक्टर मध्ये मिरवणूक काढून जल्लोषात स्वागत करण्यात आले. नवागतांचे औक्षण करून फुल देऊन व पाऊलांचे ठसे घेऊन स्वागत करण्यात आले. त्यानंतर मुलांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या वटवृक्षावर आपल्या हाताचा ठसा उमटवून माझा शाळेत प्रवेश झाला हे निश्चित केले. नवागतांना पुस्तकाचे तसेच गणवेशाचे वाटप करण्यात आले. 'एक पेड, माँ के नाम' या उपक्रमांतर्गत वृक्षारोपण करण्यात आले.यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते फीत कापून




प्रवेशोत्सव मेळाव्याचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमासाठी अंबाजोगाई तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी सुवर्णकार तसेच प्रमुख पाहुणे म्हणून युवा नेते अक्षय मुंदडा, अंबाजोगाई कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती विलासकाका सोनवणे, अधिव्याख्याता सायगुंडे सर, श्री.जामदार सर, विषय तज्ज्ञ रूद्राक्ष सर, गावचे सरपंच लिंगेश्वर तोडकर, शाळा व्यवस्थापन समितीचे माजी अध्यक्ष व्यंकटेश किर्दत, तंटामुक्ती समितीचे माजी अध्यक्ष तथा माजी सरपंच गणेश भोसले यांच्यासह शिक्षणप्रेमी नागरीक उपस्थित होते. यावेळी बोलताना युवा नेते अक्षय मुंदडा म्हणाले की, आजच्या जगात ज्ञान हीच खरी संपत्ती आहे. विद्यार्थी मित्रांनो तुम्ही जेवढे शिकाल तेवढे तुमचे भविष्य उज्ज्वल आहे. जीवन जगण्याचे बाळकडू शिक्षणातून मिळते. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कुंबेफळ विविध उपक्रम राबविण्यात येतात. या शाळेने गुणवंत विद्यार्थी घडविले आहेत. ग्रामीण भागातील विद्यार्थी आज विविध क्षेत्रात गुणवत्ता आणि मेहनतीच्या बळावर यशस्वी होत आहेत असे गौरवोद्गार मुंदडा यांनी यावेळी काढले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती हजारे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिरगे सर यांनी केले. तर श्रीमती अंबुरे, संतोष गायकवाड, कसबे सर, श्रीमती पी.यु.जाधव, श्रीमती एम.व्ही.मुंडे, श्रीमती ए.एम.लांब, एम.एम.गायकवाड, श्रीमती तोडकर, श्रीमती जाधव, अतिथी निदेशक राहूल भिसे, श्री.जाधव सर, श्रीमती भोसले आदींनी परिश्रम घेतले.




# एसबीआय बँकेच्या ७० व्या वर्धापना दिनानिमित्त धर्माबाद येथील शाखेत रक्तदान शिबिराचे आयोजन

धर्माबाद / अशोक पडोळे

एसबीआय बँकेच्या ७० व्या वर्धापना दिनानिमित्त येताळा यांच्या संयुक्त सहकार्याने रक्तदान शिबिर घेण्यात आले.येथील स्टेट बँक ऑफ धर्माबाद येथे दिनांक १६ जून सोमवार २०२५ रोजी सकाळी १०.०० ते ४ वाजेपर्यंत रक्त दान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.यात ३० बँक खातेदाराने रक्तदान केले. रक्तदान शिबिरात रक्तदान करून गरजू रुग्णांना जीवनदान द्यावे या आवाहनाला चांगला प्रतिसाद मिळाल्याचे एसबीआय बँकेचे शाखा अधिकारी राजेश रेगुल, आनंद भांडी, अनिकेत तांबे, गजानन नंदलवार, आराम खान, कनिष्क शिंदे, निलेश तलप, आनंद विघे, श्रीकांत पाटील, एस कृष्णा, महेंद्र रेड्डी, जयश्री तोटावाड, भोजराम कोलोड, कृष्णा पाबोज, श्याम बागडी यांनी सांगीतले.जिजाई ब्लड सेंटर शिवाजीनगर नांदेड यांच्या सहकार्याने रक्तदान शिबिर पार पडले.सर्व कर्मचाऱ्यांनी शिबिर घेण्यासाठी परिश्रम घेतले.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).



## वसंतराव नाईक पुतळ्यासमोरच होर्डिंग्ज उभारणार्या साखळी विरोधात फौजदारी गुन्हे दाखल करा :

# महापालिका आयुक्तांना निवेदन सादर

परभणी (प्रतिनिधी) : वसमत रस्त्यावरील स्व. वसंतराव नाईक यांच्या पुतळ्यासमोरच नियमबाह्य पध्दतीने होर्डिंग्ज लावणार्या नसीर आर्ट अॅडव्हरटायझार, अरिहंत डिजिटल व अन्य एजन्सी तसेच जाहीरात विभागात कार्यरत महापालिका सहाय्यक आयुक्तांपासून निरीक्षकांविरोधात फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी संतप्त नागरीकांनी महापालिका आयुक्तांना सादर केलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.श्रीमती नंदा राठोड, अॅड. विवेक राठोड, निलेश राठोड, दिपक जाधव, शिवराम जाधव, ऋतुराज जाधव, राजूदास पवार, शिवहरी राठोड, गणेश राठोड, रेणुकाबाई लक्ष्मण जाधव, सुधाकर आडे, गोटू बागल, संतोष बागल, कुणाल राठोड आदींनी आयुक्तांना सादर केलेल्या निवेदनातून स्व. नाईक यांच्या पुतळ्यासमोरच मोठ मोठे होर्डीग्ज लावण्याचे अघोरी प्रकार सुरु केल्याबद्दल आश्चर्य व्यक्त केले. पूर्णतः नियमबाह्य पध्दतीने हे प्रकार एजन्सीधारकाकडून व्हावेत हा भयावह प्रकार आहे. महामानवाच्या पुतळ्याचे पावित्र्यसुध्दा राखण्याचे भान या एजन्सीधारकांकडून दाखविले जात नसल्याबद्दल तीव्र खंत व्यक्त करीत संबंधित एजन्सीधारकाविरोधात तात्काळ फौजदारी गुन्हे दाखल करावेत अन्यथा बंजारा, कुणबी व तमाम बहुजन समाजाच्या रोषास सामोरे जावे लागेल, असा इशारा या निवेदनाद्वारे दिला आहे.

# मुलांना चांगल्या संस्कारासह यश-अपयश पचवायला शिकवा - आ.डॉ.गुट्टे

## 'चला शाळेत जाऊया' उपक्रमातंर्गत मुलांचे स्वागत : चिमुकल्यांच्या किलबिलाटाने शाळा गजबजली

गंगाखेड (प्रतिनिधी):-

शाळा म्हणजे केवळ इमारत नसते, तर ज्ञान आणि संस्काराचे केंद्र असते. कारण, शालेय जीवनाची सुरुवात हा प्रत्येक विद्यार्थ्याच्या आयुष्यातील महत्त्वाचा टप्पा असतो. त्यामुळे शाळेतले चिमुकले विद्यार्थी आपल्या टपोर्या डोळ्यामध्ये उद्याची स्वप्ने घेऊन शिकत असतात. म्हणून शाळेत त्यांना प्रेरणा, प्रोत्साहन, आत्मविश्वास आणि संस्कार मिळतात. तसेच त्यांच्या आयुष्याला आकार मिळतो. त्यांच्या उज्ज्वल भविष्याची सुरूवात सुध्दा शाळेतच होते. त्यामुळे त्यांना शालेय अभ्यासक्रमांच्या पलीकडे जाऊन चांगले आणि वाईट संस्कार द्यावे लागतील. तसेच उद्याचा परिपूर्ण माणूस होण्यासाठी मुलांना चांगली शिकवण द्यावी लागेल. त्यामुळे शाळेतील मुलांना चांगल्या संस्कारासह यश-अपयश पचवायला शिकवा, असे आवाहन स्थानिक आमदार डॉ.रत्नाकर गुट्टे यांनी केले.

महाराष्ट्र शासनाच्या प्रवेशोत्सव उपक्रमातंर्गत तालुक्यातील मौजे.बनपिंपळा आणि शहरातील मन्नाथ नगर येथील जिल्हा परिषद शाळेतील चिमुकल्यांचे स्वागत आ.डॉ.गुट्टे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. त्यावेळी शिक्षक आणि विद्यार्थ्यांशी संवाद साधताना ते बोलत होते. याप्रसंगी त्यांनी आपल्या शालेय आयुष्यातील आठवणींना उजाळा दिला. तसेच शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांकडून शाळेची प्रगती, सोईसुविधा, समस्या व अडचणी याविषयी सविस्तर माहिती घेतली. शिवाय, शाळा भेटीचे औचित्य साधून पहिल्या दिवशी शाळेत दाखल झालेल्या चिमुकल्यांचे स्वागत करून त्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या वतीने दिनांक १६ ते २६ जून या कालावधीत 'चला शाळेत जाऊया' हा उपक्रम राबविला जात आहे.



पुढे बोलताना आ.डॉ.गुट्टे म्हणाले की, शाळा ही केवळ एक शालेय शिक्षणाची जागा नाही. ती माणूस घडवण्यासाठी एक महत्त्वाची कार्यशाळा आहे. गणिताच्या साध्या आकडेमोडी किंवा विज्ञानाच्या गोष्टी शिकणे महत्त्वाचे आहे. परंतु त्याहून महत्त्वाचे असते ते शाळेत मिळालेल्या संस्कार, मूल्ये आणि जीवनाची खरी शिकवण. जेव्हा एखादा विद्यार्थी शाळेच्या दारात पाऊल ठेवतो, तेव्हा त्याच्याजवळ केवळ दप्तर असते, असे नाही, तर त्याच्या मनात एक स्वप्न असते. ते म्हणजे शिकायचे, पुढे जायचे आणि मोठे व्हायचे. पण खरे मोठे होणे म्हणजे फक्त पदवी मिळवणे नाही, तर एक चांगला माणूस बनणे होय. शाळा आपल्या शिक्षणासोबतच आदर, प्रेम, नम्रता आणि सहकार्याची शिकवण देते. शिक्षक केवळ अक्षर ओळख शिकवत नाहीत, तर ते आपल्याला इतरांच्या भावना समजून त्यांच्याशी संवेदनशीलतेने वागायला शिकवतात. शाळेतील शिक्षक हे आपल्या जीवनाचे शिल्पकार असतात, जे आपल्या गुणांची ओळख करून, त्यांना अधिक चांगले बनवण्याचा मार्ग दाखवतात.

शाळा हीच जीवनाची शाळा आहे. ती आपल्याला नियम पाळायला शिकवते. शिस्तीचा आदर करायला शिकवते. जबाबदारी घेण्याची जाणीव देते. सकाळी ठरलेल्या वेळेला शाळेत पोहोचणे, होमवर्क पूर्ण करणे, गणवेष नीट घालणे ही केवळ शालेय शिस्त नाही, तर जीवनातली जबाबदारी ओळखण्याची प्रारंभिक पायरी आहे. याच सवयींमुळे एक व्यक्ती नंतर एक जबाबदार आणि यशस्वी नागरिक बनतो. शिक्षण हे फक्त परीक्षा पास होण्यासाठी नाही, तर ते मनाची जडणघडण आहे. मार्क मिळवणे खरे आहे, पण त्याहून महत्त्वाचे असते ज्ञान मिळवणे. शाळा विद्यार्थ्याला फक्त परीक्षेच्या तयारीसाठी तयार करत नाही, ती त्याला जीवनाच्या कठीण प्रसंगांना तोंड देण्याची क्षमता शिकवते.



## मिल्लीया माध्यमिक शाळा धारूर येथे पहिल्या दिवशी विध्यर्थ्याचा स्वागत

## शाल्ये साहित्य व पुस्तके वाटप

धारूर (प्रतिनिधी)

अंजुमन ईशात ए तालीम बीड संचालित मिल्लीया माध्यमिक शाळा धारूर येथे १६ जून सोमवारी शाळेच्या पहिल्या दिवशी विध्यर्थ्यांना फुले देऊन सत्कार करण्यात आले.या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक काजी जैनुल आंबेदिन सर होते तर प्रमुख पाहुणे मध्ये पालक वर्ग उपस्थित होते.कार्यक्रम ची सुरुवात पवित्र कुराण पठण करून झाली त्या नंतर नात पठाण करण्यात आले होते.कर्यक्रमात विध्यार्थना साहित्य टिफिन, पाणी बॉटल, कॅम्पस बॉक्स देण्यात आले.तसेच पुस्तके ही वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कामराम सर यांनी केले तर आभार प्रदर्शन अयाज कागजी सर यांनी केले या वेळी वाजेद सर, फेरोज सर, मजेद सर, नजीर सर, रेहान सर, इंजमाम सर, मसरत बाजी,फरहीन बाजी, हुमेरा बाजी, आदिल चाऊस, शेख मुबीन

# चला शाळेला - सुट्या संपल्या : जिल्ह्यात उत्साहात गावोगावी शालेय विद्यार्थ्यांचे स्वागत

वांगी येथे सोमवार दि १६ जून रोजी सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाची सुरुवात जि. प. कें. प्रा. शाळा , वांगी येथे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या विशेष उपस्थितीत करण्यात आली . या प्रसंगी विदयार्थ्यांना पुष्पगुच्छ , पुस्तके व गणवेश वाटप करण्यात आले .

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या आदेशाने आज जिल्हाभरात विविध विभागाचे अधिकारी सकाळीच विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यासाठी पोहोचले . विद्यार्थ्यांना शाळेची गोडी लागावी , पहिल्या दिवसापासूनच हजेरी वाढावी आणि एकंदरीतच शैक्षणिक वातावरण निर्मिती व्हावी हा या मागचा उद्देश आहे . अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक , निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी व स्वत: जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन विविध शाळांमध्ये उपस्थित होते .

वांगी येथे शाळेत तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी १०० टक्के विद्यार्थ्यांची पटनोंदणी व्हावी व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांच्या इयत्ता १ ली च्या पटात लक्षणीय वाढ होण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत , गावातील अंगणवाडी व बालवाडी यांना शिक्षकांनी भेट देऊन त्यातील इयत्ता पहिलीमध्ये दाखल पात्र विद्यार्थी यादी घ्यावी व त्यांचा प्रवेश करून घ्यावा , जिल्हा परिषद शाळांमधील सोयी सुविधा , शिष्यवृत्ती , विविध उपक्रम याबाबत पालकांना माहिती द्यावी अशा सूचना शिक्षकांना दिल्या . त्यांनी विदयार्थ्यांशी संवाद साधताना त्यांना जीवनात असलेले शिक्षणाचे महत्व पटवून दिले . शाळेतील विदयार्थ्यांची संख्या वाढण्यासाठी प्रयत्न करावेत असे त्यांनी सांगितले . पुढे बोलताना त्यांनी विदयार्थ्यांचा शिक्षणाबरोबरच कला , क्रीडा , आरोग्य असा सर्वांगीण विकास व्हावा अशी अपेक्षा व्यक्त केली . शिक्षकांबरोबरच गावातील इतर उच्चशिक्षित नागरिकांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा , सामान्य ज्ञान याबाबत मार्गदर्शन करावे तसेच पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी झाडांचे महत्व सांगून वृक्षारोपण करण्याचे आवाहन केले . तहसीलदार शेळके यांनी फार्मर आयडी , जिवंत ७/१२ मोहीम , विविध शासकीय योजना , संजय गांधी निराधार योजना ,श्रावण बाळ योजना , ग्रामस्वच्छतेबाबत



मार्गदर्शन केले . तसेच त्यांनी गावागावात विविध शिबिरे घेऊन गावातच लोकांना त्यांची कामे पूर्ण करून द्यावी , असे आवाहन केले . शेतकऱ्यांनी ई पीक पाहणी करणे बाबत मार्गदर्शन केले . तसेच शेतकऱ्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी आवाहन केले . शेतकऱ्यांचे प्रश्न गाव पातळीवरच मिटवून त्यांना न्याय देण्यात यावा असे आवाहन त्यांनी यावेळी केले .

केंद्रप्रमुख आजिनाथ हाडूळे यांनी प्रस्तावना करताना शाळेविषयी आणि एकंदरीतच गावाविषयी सविस्तर माहिती दिली . वांगी हे गाव निसर्गाच्या कुशीत वसलेले गाव असून चारही बाजूने डोंगरांनी वेढलेले गाव आहे . आजकाल दळणवळणाच्या सुविधा दिसून येत असल्या तरी यापूर्वी अशा सुविधा नव्हता . तथापि अशा प्रतिकूल परिस्थितीतून सुद्धा या गावाने अनेक नोकरदार , अनेक अधिकारी कर्मचारी , डॉक्टर , इंजिनिअर घडविले असल्याचे त्यांनी सांगितले .

तहसीलदार शेळके विद्यार्थी व शिक्षकांशी संवाद साधताना त्यांच्या अडचणी, तक्रारी समजावून घेतल्या व त्याचे निरसन करण्याची शाश्वती दिली . उपस्थित शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेबद्दल माहिती दिली . विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी सर्व शिक्षक प्रयत्नांची पराकष्ठा करत असून या शाळेमधून अनेक गुणवंत विद्यार्थी घडत आहेत असे सांगितले . कार्यक्रमास विद्यार्थ्यांचा उत्फूर्त प्रतिसाद होता . त्यांनी शाळेत मध्यान्ह आहार उत्तम असतो , शाळेत मोफत पुस्तके मिळतात इ. माहिती दिली .ग्राम महसूल अधिकारी राधिका बहीर यांनी नमूद केले की गावातील सर्व नागरिकांना , शेतकऱ्यांना वेळेवर सुविधा पुरविण्यात येतात . सर्व शेतकऱ्यांनी फार्मर आयडी काढून घ्यावा . तसेच जिवंत सातबारा मोहीम दोनचा लाभ घ्यावा . सध्या महाराजस्व अभियान सुरू आहे , त्या अनुषंगाने महसूल विभागाच्या अनेक योजनांचा आपण लाभ घेऊ शकता , असेही त्यांनी सांगितले .

या कार्यक्रमास ग्राम महसूल अधिकारी राधिका बहीर , अशोक वाघमारे , केंद्रप्रमुख आजिनाथ हाडूळे , मुख्याध्यापक निरंजन धनवे , मुख्याध्यापक निरंजन धनवे , अशोक वाघमारे , बाबुराव शेळके ,महादेव शेळके , शिक्षक आनंद शिंदे , सी. एस.सी.चालक रोहित राऊत , इतर शिक्षक व ग्रामस्थ उपस्थित होते .

# जि.प.ची काजीपार येथील नूतन प्राथमिक शाळा मोडकळीस तरीही वर्ग सुरु

## पावसाळ्यात कुठल्याही क्षणी शाळा कोसळू शकते विद्यार्थ्यांच्या जीवितास धोका

परळी (प्रतिनिधी)

जिल्हा परिषद अंतर्गत काझीपार नूतन प्राथमिक शाळा परळी येथे ज़िपची शाळा अनेक वर्षापासून सुरू आहे.शाळेची स्थापना १९५३ झाली असून. पहिली ते सातवी पर्यंत असून पटसंख्या खूप कमी आहे. शाळेत फक्त सहा विद्यार्थी उपस्थित होते व दोन शिक्षक. शाळेची साफसफाई स्वच्छता कुठेच केलेली दिसत नाही. ही शाळा खाजगी मालकीच्या मोडकळीस आलेल्या इमारतीमध्ये विद्यार्थ्यांचे वर्ग भारतात. इमारतीचा मालक भाड्यापोटी वर्षाला लाखो रुपये घेत आहे. रख रखा डागडुजी थातूरमातूर पद्धतीने करतो.ही शाळेची इमारत मोडकळीस आली असून शाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे. तात्काळ मोडकळीस आलेल्या इमारती मधून शाळा इतरत्र हलवा,किंवा स्थलांतरित करा. अशी मागणी या भागातील पालकांकडून केली जात आहे. दिनांक १६ जुन २०२५ पासून शाळा सुरू



झाले आहेत. काजीपार शाळेची सध्या दयनीय अवस्था असून शाळा ही मोडकळी झाली आहे. ही शाळा कधीही पावसात पडू शकते त्यामुळे विद्यार्थ्यांच्या जीवनात धोका निर्माण झाला आहे. गटशिक्षणाधिकारी, शाळेचे मुख्याध्यापक, शाळेच्या इमारतीचा मालक या शाळेत काही दुर्घटना घडली तर जबाबदार असतील. लवकरात लवकर ही शाळा स्थलांतरित करावी किंवा इतरत्र हलवावी. अन्यथा मोठा अनर्थ होऊ शकतो. याला जिल्हा परिषद शिक्षण विभागने तात्काळ उपाययोजना करावी अशी मागणी या भागातील शाळा शिकत असलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांनी केली आहे.

## मनुर येथील सर्वे क्र.२० येथे पैठण उजवा कालवा प्रकल्पाची

# चारी पुर्णपणे उध्वस्त करण्यात आली, गुन्हे दाखल करुन कार्यवाही करा -शेख रशिद



माजलगाव (प्रतिनिधी)

मनुर येथील सर्वे क्र.२० येथे शेती मध्ये प्लॉटिंगच्या नावावर पैठण उजवा कालवा प्रकल्पाची चारीची तोडफोड करुन उध्वस्त करण्यात आली आहे. ह्या संबंधित लोकांवर महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम १९७६ अन्वये व महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ परिच्छेद ५०,५३ व ५४ अन्वये नुसार गुन्हे दाखल करुन कारवाई करण्यात यावे ह्यासाठी सामाजिक कार्यकर्ता शेख रशिद यांनी माजलगाव जलसंपदा विभागला निवेदन दिले आहे. पैठण उजवा कालवा प्रकल्पामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळत असतो.शेतकर्यांना हया चारी मुळे पाणी पुरवठा करण्यात मदत होते पण काही प्लॉटिंगवाल्यांनी पैठण उजवा कालवाची चारी पुर्णपणे उध्वस्त करण्यात आली आहे.पैठण उजवा कालवा लाभक्षेत्रातील वितरिका क्र.७४ मायनर क्र.एम आर १ साखळी क्र.३२८० मि.ते ३३७०मि.असे एकुण अंदाजे ८० मि ते ९५ मि. चारी पुर्णपणे उध्वस्त करण्यात आले आहे.महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम १९७६ अन्वये व महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ परिच्छेद ५०,५३ व ५४ अन्वये नुसार गुन्हे दाखल करुन कार्यवाही करा नसता लोकशाही मार्गाने तिव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा सामाजिक कार्यकर्ता शेख रशिद यांनी शाखाधिकारी जलसंपदा विभाग माजलगाव यांना निवेदन देऊन इशारा दिला आहे.

# अन्यायकारक फीस वाढीविरोधात आवाज बुलंद - प्रशासनाला दिले निवेदन

बीड ।प्रतिनिधी

ऑल इंडिया स्टुडंट फेडरेशन बीड जिल्हा समितीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयात व शिक्षणाधिकारी जिल्हा शिक्षण विभाग बीड येथे दि. १६ जून २०२५ या दिवशी निवेदन देण्यात आले. ज्यात शाळांमध्ये सुरू असलेली अन्यायकारक व मनमानी पद्धतीने वाढवण्यात आलेली फी तत्काळ मागे घेण्याची मागणी करण्यात आली.

-खडऋ च्या कार्यकर्त्यांनी शाळांच्या व्यावसायिकरणाविरोधात जोरदार घोषणाबाजी करत, विद्यार्थ्यांच्या पालकांवरील आर्थिक ओझं वाढवणाऱ्या या धोरणाचा तीव्र निषेध व्यक्त केला. निवेदनाद्वारे त्यांनी शासनाच्या शिक्षण धोरणावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत, शिक्षण हे अधिकार असून, त्याचा बाजार मांडू नये, अशी भूमिका मांडली.-खडऋ चे राज्य कौन्सिलर जगताप विनायक, राज्य कौन्सिलर जाणव्ही हुरकुडे, योगेश वाघमारे व जगताप कृष्ण सुधीर आपरे विकास जगताप विद्यार्थ्यांचे पालक म्हणून उत्तरेश्वर सपाटे यांनी सांगितले की, शासनाने आरटीई कायद्याअंतर्गत सर्व विद्यार्थ्यांना समतामूलक व मोफत शिक्षण देण्याचे आश्वासन दिले होते. मात्र प्रत्यक्षात खासगी शाळा फीच्या नावाखाली लुट करत आहेत. गरिबांच्या लेकरांना शिक्षणाच्या अधिकारापासून वंचित ठेवले जात आहे. विशेष म्हणजे ज्यावेळेस आम्ही शिक्षण अधिकारी यांना निवेदन देण्यास गेलो त्यावेळेस त्यांनी दबाव टाकून आम्हास निवेदन देतानाचा फोटो काढून दिलेला नाही. ही दाब दडपशाहीची क्रती बरोबर नाही. याचा तीव्र निषेध आम्ही करतो.निवेदनात पुढील मागण्या करण्यात आल्या आहेत.सर्व शाळांनी वाढवलेली फीस तत्काळ मागे घ्यावी , शालेय शिक्षण विभागाने फी संरचनेवर नियंत्रण ठेवण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभी करावी, गरजू विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना प्रभावीपणे राबवावी,शाळांवर आर्थिक ऑडिट व पारदर्शकता अनिवार्य करावी.यावेळी -खडऋ चे कार्यकर्ते, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. निवेदन प्रशासनाकडे सादर करून जर शासनाने लवकर निर्णय घेतला नाही, तर जिल्ह्यात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देखील देण्यात आला.

## भाऊसाहेब टकले यांचे दुःखद निधन



अंबड ।प्रतिनिधी

भाऊसाहेब चंद्रभान टकले (वय ५६ रा.रोहिलागड ता.अंबड जि.जालना ) यांचे सोमवारी दि.१६/०६/२०२५ रात्री तीन वाजता अल्पशा आजारानी निधन झाले. त्याच्या पार्थिवावर मंगळवार दि .१७/०६/२०२५ दुपारी १ वाजता अत्यसंस्कार करण्यात आले.त्याच्या पाश्चात्य पत्नी. दोन मुल .दोन सुना. तिन मुली. नातवंडे. असा परिवार आहे.

# ट्रकने दिलेल्या धडकेत मोटारसायकलस्वाराचा जागीच मृत्यू

## पाथरी रस्त्यावरील दुर्दैवी घटना : ट्रक चालकाचा निष्काळजीपणा कारणीभूत

**परभणी (प्रतिनिधी) : पाथरी रस्त्यावरील ठोक भाजी मार्केटसमोरील रस्त्यावर मंगळवारी (दि.१७) सकाळी नऊ वाजेच्या सुमारास भरधाव वेगाने जाणार्या एका ट्रकने दिलेल्या जोरदार धडकेत स्कुटीवरुन जाणार्या एका व्यक्तीचा जागीच मृत्यू झाला.**

विसावा नाक्यापासून ते भाजी मार्केटपर्यंतच्या पाथरी रस्त्यावर सकाळपासून रात्री उशीरापर्यंत मोठ्या प्रमाणावर वाहतूकीची कोंडी होत आहे. कालव्यावरील अरुंद पुल अन् त्यात रस्त्याच्या दुतर्फा अतिक्रमणामुंळे रस्ता धोकादायक झाला आहे. या स्थितीत मंगळवारी सकाळी एक स्कुटीस्वार (एम.एच.२२ ए.एस.७५७३) भाजी मार्केटच्या दिशेने जात होते. त्यावेळी पाथरीहुन भरधाव वेगाने येणार्या एम.एच.२२ एच.डी. ९३३३ या क्रमांकाच्या ट्रकने त्यांना जोरदार धडक दिली. त्या धडकेत स्कुटीस्वार जागीच मृत्यू पावला. घटने नंतर रस्त्यावर रक्ताचा अक्षरशः सडा सांडला होता. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेवून त्या दुचाकीचा नंबर व खिशात मिळालेल्या आधार कार्डच्या आधारे स्कुटीस्वाराची ओळख पटविली. या अपघातात मृत्यू पावलेल्या व्यक्तीचे नाव अनंत अच्युतराव कुलकर्णी (वय ६१) असे आढळून आले.

दरम्यान, या प्रकरणात मयुर कुलकर्णी यांनी दिलेल्या तक्रारीच्या आधारे ट्रकचालक सुरज शेख खाजा मियाँ (रा. सेलापूरी जि.बीड) याच्या विरोधात मरणास कारणीभूत ठरल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# विल्हाडी जि.प. शाळेत खा.डॉ. कल्याण काळे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचे मनोभावे स्वागत

जालना ।प्रतिनिधी

तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, विल्हाडी येथे शाळेच्या नव्या शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीचा व वेशभूषा दिनाचा विशेष कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी खासदार डॉ. कल्याण काळे यांच्या शुभहस्ते यत्ता पहिलीच्या नवागत विद्यार्थ्यांचे औपचारिक स्वागत करून, त्यांना गणवेश, शालेय साहित्य व पुस्तके वितरित करण्यात आली.



कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थ्यांच्या वेशभूषा रॅलीने झाली. शाळेच्या प्रवेशद्वारावर विद्यार्थ्यांनी डॉ. काळे यांचे पुष्पगुच्छ देऊन जल्लोषात स्वागत केले. या प्रसंगी उपस्थित पालक, ग्रामस्थ व शिक्षकवृंदांमध्ये आनंदाचे वातावरण होते.यावेळी बोलताना खा. डॉ. काळे म्हणाले, जिल्हा परिषद शाळांमध्ये शिकलेली मुलेसुद्धा खासदार, आमदार, अधिकारी बनू शकतात. अशा शाळांकडे पालकांनी विश्वासाने पाहायला हवे. त्यांनी इंग्रजी भाषेतील प्रगतीचे कौतुक करत सांगितले की, विल्हाडी शाळेतील विद्यार्थी इंग्रजीमध्ये उत्तम संवाद साधतात आणि काही इंग्रजी शाळांनाही मागे टाकत आहेत, असे गौरवोद्गार त्यांनी काढले. यासाठी त्यांनी शिक्षकांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.कार्यक्रमात मुख्याध्यापक श्री. विष्णू सोनटक्के यांनी शाळेची प्रगती व उपक्रमांची माहिती दिली. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांचे त्यांनी सादरीकरण केले.

डॉ. काळे यांच्या हस्ते एक नाम एक पेड़ उपक्रमाअंतर्गत शालेय परिसरात वृक्षारोपणही करण्यात आले. यावेळी त्यांनी १७४ विद्यार्थ्यांना पेन, पेन्सिल व मिठाईचे वाटप केले.या कार्यक्रमात शाळा व्यवस्थापन समिती, ग्रामपंचायत, व शिक्षकवृंदांतर्फे खासदार डॉ. काळे यांचा सत्कार करण्यात आला. गावकऱ्यांतर्फे विविध मागण्यांचे निवेदनही त्यांना सादर करण्यात आले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. विनोद पांडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन मुख्याध्यापक श्री. सोनटक्के यांनी केले.जयप्रकाश चव्हाण राम शिरसाठ, सुभाष बोडखे लक्ष्मणराव म्हसलेकर, विलास जुबडा, प्रभाकर तांबे, देवजी नाना जन्हाड जुल्फीकार बागवान, अरुणा पैठणे, जितेंद्र तोडावत शिक्षण विस्तार अधिकाटी वानखेडे, केंद्रप्रमुख विकास पोथरे, सरपंच माऊली इनामे, मुजीब सौदागर, बाबूराव, पाटोळे, जयसिंग राजपूत, भगवान कान्हेरे, संजय कान्हेरे, शिवाजी कान्हेरे, लक्ष्मण इनामे, श्री चे सेवेकरी महिला मंडळ सर्व यांसह शिक्षणप्रेमी पालक उपस्थित होते

# उपशिक्षणाधिकारी बोराडे मॅडम यांनी दिली जन्मगाव असलेल्या हिंगणी बु शाळेला हृदयस्पर्शी स्नेहभेट

बीड ।प्रतिनिधी

हिंगणी बु येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये शाळा प्रवेशोत्सव २०२५-२६ पंधरवडा निमित्त एक अविस्मरणीय आणि भावुक क्षण अनुभवायला मिळाला.या निमित्ताने जिल्हा परिषद,बीडच्या उपशिक्षणाधिकारी मैनाताई बोराडे मॅडम यांनी आपल्या जन्मगावातील शाळेला स्नेहभेट दिली.



कार्यक्रमाची सुरुवात नवागत विद्यार्थ्यांच्या स्वागताने झाली. पहिलीत दाखल झालेल्या विद्यार्थ्यांचे हार,पुष्पगुच्छ देऊन स्वागत बोराडे मॅडम यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तक व गणवेशाचे वितरण करण्यात आले. 'एक मुलगा एक झाड' या उपक्रमा अंतर्गत मॅडम व उपसरपंच अंकुशराव गोरे साहेब यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बोराडे मॅडम होत्या. प्रमुख उपस्थितीत उपसरपंच अंकुशराव गोरे, रविंद्र चव्हाण अध्यक्ष तंटामुक्ती समिती,ग्रामपंचायत सदस्य अंकुश नाईकवाडे, सयाजी जाधव,शिक्षणप्रेमी नागरिक अजित काका कुलकर्णी,किशोर लगास,देविदास जोगदंड,बाळासाहेब बोराडे,बिभिषण वायसे, मच्छिंद्र सुरवसे,विजय वायसे, मधुकर कुलकर्णी,नवनाथ पवार,भिकाराम वायसे,ज्येष्ठ नागरिक ,उत्तरेश्वर राऊत आदी मान्यवर उपस्थित होते.


बोराडे मॅडम यांचा साडी, शाल व पुष्पगुच्छ देऊन शाळा परिवार आणि ग्रामस्थांकडून सन्मान करण्यात आला. उपसरपंच अंकुशराव गोरे यांचाही यथोचित सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जितेंद्र औताने सर यांनी तर प्रस्ताविक मुख्याध्यापक संजय कोकाटे सर यांनी सादर केले.उपस्थित मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त करत शाळेच्या प्रगतीचे कौतुक केले.शिक्षणप्रेमी नागरीक अजित काका कुलकर्णी यांनी शाळेच्या योगदानाचे मनापासून गौरव केले.उपसरपंच अंकुशरावजी गोरे साहेब यांनी आपले मनोगत व्यक्त केले, मनोगतामध्ये लोकसहभागातून शाळेची रंगरंगोटी,ग्रामपंचायतीच्या माध्यमातून सोलार पॅनल विद्यार्थ्यांना बसण्यासाठी बेंच शाळेच्या मैदानावर फेवर ब्लॉक,खुर्ची,चटई देण्यात आली, किचन शेड रूम धोकादायक असल्यामुळे नवीन किचन शेड ला मंजुरी देण्यात यावे अशा मागण्यांचे निवेदन उपशिक्षणअधिकारी बोराडे मॅडम यांना देण्यात आले.बोराडे मॅडम यांनी आपल्या बालपणीच्या आठवणी सांगत भावनिक शब्दांत आपल्या मनोगतात शाळेच्या उन्नतीबद्दल समाधान व्यक्त केले. हीच ती शाळा जिथे मी माझे प्राथमिक शिक्षण घेतले, आणि आज या शाळेच्या प्रगतीला पाहून मन भरून आले,असे सांगताना मॅडम भावुक झाल्या. गावातील वडीलधारी मंडळी व महिला यांना पाहून,बालपणी च्या जुन्या आठवणी त्यांचे डोळे पाणावले.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सर्फराज सिद्धीकी सर यांनी केले.शाळेतील सहशिक्षक पोपट गायकवाड सर,ट्रेनी शिक्षक रोहित वायसे सर यांचीही उपस्थिती लाभली.हा कार्यक्रम म्हणजे केवळ एक औपचारिक भेट नव्हे, तर आपल्या मातीवरील, शाळेवरील आणि माणसांवरील आपुलकीची साक्ष देणारा एक भावस्पर्शी प्रसंग ठरला.

# कोरेगाव भीमा जयस्तंभ बचाव समितीच्या जालना महिला जिल्हा अध्यक्षपदी ललिता घनसावध यांची नियुक्ती

परतूर ।प्रतिनिधी

कोरेगाव भीमा जयस्तंभ बचाव समितीच्या जालना महिला जिल्हा अध्यक्षपदी ललिता घनसावध यांची नियुक्ती करण्यात आली आहे.भीमा कोरेगाव विजयस्तंभ विकासासाठी सरकार अनेक वेळा निधीची घोषणा करीत असले तरी भीमा कोरेगाव विजयस्तंभ अतिक्रमण व जागेचा मालकी हक्क हे प्रकरण न्यायालयात प्रलंबित असल्याने कसलाही विकास करता येणार नाही म्हणून प्रथम न्यायालयाचा खटला जिंकणे ही आपली सर्वांची पहिली आणि सामुहिक जबाबदारी आहे. भीमा कोरेगाव विजयस्तंभ अतिक्रमण व जागेचा मालकी हक्क हा प्रशासकीय व न्यायालयीन लढा प्रत्येक गावात, शहरात, तालुक्यात, जिल्ह्यात, राज्यात व राष्ट्रीय पातळीवर जनजागृती करण्यासाठी व हा लढा समाजभिमुख व्हावा म्हणून जनजागृती अभियान राबवण्यात येणार आहे. न्यायालयाचा खटला गतिमान व्हावा आणि लवकरात लवकर निकाल लागावा म्हणून या लढ्यात सर्वांनी सहभागी व्हावे म्हणून कोरेगाव भीमा जयस्तंभ बचाव समिती स्थापन करण्यात आलेली असून कोरेगाव भीमा जयस्तंभ बचाव समितीचे अध्यक्ष दादाभाऊ अभंग यांनी कोरेगाव भीमा जयस्तंभ बचाव समितीच्या जालना जिल्हा अध्यक्ष (महिला) या पदावर सामाजिक कार्यकर्त्या आयु. ललिता माधव घनसावध यांची नियुक्ती करण्यात आली असून त्या मागील अनेक वर्षांपासून आंबेडकरी चळवळीत कार्यरत आहेत. आयु. ललिता माधव घनसावध या मानव अधिकार संघटनेच्या जालना जिल्हा अध्यक्ष असून अत्यंत निर्भीड आणि आक्रमक व भ्रष्टाचार विरोधी सामाजिक कार्यकर्त्या म्हणून त्यांची जालना जिल्ह्यात ओळख असून त्या पत्रकार आहेत.भीमा कोरेगाव विजयस्तंभ अतिक्रमण न्यायालयीन लढ्यात त्या मागील काही वर्षांपासून सक्रिय सहभागी आहेत. या ऐतिहासिक न्यायालय लढ्यात आयु. ललिता माधव घनसावध जनजागृतीचे काम तन, मन आणि आपले सर्वस्व लावून करतील अशी अपेक्षा.त्यांच्या पुढील कार्यास हार्दिक शुभेच्छा.



# एमएचटी सीइटी परीक्षेत बीडच्या ऋतिक राहुल बोराचे यश

बीड ।प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याच्या वतीने घेण्यात येणाऱ्या कॉमन एंट्रन्स टेस्ट एमएचटी-सीईटी परीक्षेमध्ये बीडचा विद्यार्थी ऋतिक राहुल बोरा याने घवघवीत यश संपादन केले आहे. ऋतिक यास पीसीएम गटा मध्ये ९९.०२ परसेंटाइल गुण मिळाले आहेत. या यशाचे श्रेय त्याचे शिक्षक वृंद, आई, वडिल, आजी, काका व काकू यानां दिले आहे. ऋतिकच्या सतत अभ्यासाचा ध्यास, सचोटी व आई बाबांचे मार्गदर्शन व प्रेरणे मुळे आपण हे यश संपादित करु शकल्याचे ऋतिक ने म्हटले आहे. ऋतिक बोरा हा बीड येथील नामांकित सिव्हिल इंजिनिअर राहुल बोरा याचां मुलगा आहे. ऋतिकने पुढे सिव्हिल इंजीनियरिंग करण्याचा मनास व्यक्त्य केला आहे. ऋतिकच्या यशा बद्दल सर्व स्तरातून कौतुक व अभिनंदन होत आहे.






# भोकरदन तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी मी सदैव कटिबध्द - खा.डॉ.कल्याण काळे

जालना ।प्रतिनिधी

भोकरदन तालुक्यातील चांदाई (एक्को) येथे खासदार डॉ.कल्याण काळे यांच्या स्थानिक विकास निधीतून रुपये १० लक्षांच्या खर्चाने चांदाई (एक्को) येथील श्री खोलेश्वर मंदिरासमोरील परिसरात प्लेवर ब्लॉक बनविण्याच्या कामाचा शुभारंभ करण्यात आले आहे.यावेळी प्रारंभी श्री खोलेश्वर मंदिराजवळ पूजन करण्यात आले या विकास कामामुळे मंदिर परिसर अधिक स्वच्छ सुसज्ज आणि भाविकांना सुगम होणार आहे ग्रामस्थांना व पर्यटकांना सुविधाजनक परिसर व गावाच्या विकासात भर आणि गावाचे सौंदर्य व धार्मिक पर्यटन वाढीस चालना मिळणार आहे यावेळी जयप्रकाश चव्हाण,राम शिरसाठ, कैलास पुंगळे, अरुण पैठणे व युवक,ग्रामपंचायत पदाधिकारी व सदस्य ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मंत्रिमंडळ निर्णय (संक्षिप्त-१०) (मंगळवार, दि. १७ जून २०२५)

ट्रायबल इंडस्ट्रियल क्लस्टरसाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास नाशिक जिल्ह्यातील मौजे जांबुटके येथील २९ हेक्टर ५२ आर जमीन. आदिवासी समाजातील होतकरू उद्योजकांना प्रोत्साहन, रोजगार निर्मिती व आर्थिक विकासास चालना मिळणार. (महसूल विभाग)

एमएमआरडीए आणि मेसर्स रायगड पेण ग्रोथ सेंटर लि. यांच्या संयुक्त प्रकल्पासाठी आवश्यक जमिनीवरील मुद्रांक शुल्कात सवलत. सार्वजनिक, खासगी भागिदारीतून हा राज्यातील पहिलाचा मोठा प्रकल्प. ग्रोथ सेंटरमुळे विदेशी गुंतवणूक आकर्षित होणार. (महसूल विभाग)

मुंबईतील महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठासाठी आवश्यक मौजे पहाडी गोरेगाव येथील जमिनीच्या हस्तांतरणावरील मुद्रांक शुल्क माफ. विद्यापीठाला स्व-मालकीची इमारत मिळणार. हजारो विद्यार्थ्यासाठी शैक्षणिक सुविधा उपलब्ध होणार. (महसूल विभाग)

धारावी पुनर्विकास प्रकल्पातील विशेष हेतू कंपनी (डझत) आणि अन्य यंत्रणा दरम्यानच्या भाडेपट्टा करारावरील मुद्रांक शुल्क माफ. लोकहितार्थ मोठा प्रकल्प असल्याने, पुनवर्सन व पुनर्विकास योजनेला गती लाभणार. योजनेची अंमलबजावणी सुलभ रीतीने होणार. (महसूल विभाग)

केंद्र सरकारच्या थखछऊ (थशरींहशी खपषेींरींळेप छशीुेीज़ अींर ड्डीेंशा) प्रकल्पाअंतर्गत ग्रामपंचायत स्तरावर स्वयंचलित हवामान केंद्रांची (-थड- -ीेंरींळल थशरींहशी डींरींळेप) उभारणी करण्यात येणार. यासाठी महावेध प्रकल्पास मुदतवाढ देण्याचा निर्णय. राज्यातील सर्व गावांमध्ये हवामान विषयक अचूक माहिती मिळावी यासाठीचा प्रकल्प. शेतकऱ्यांना हवामानाधारित कृषि विषयक सल्ला व मार्गदर्शनासाठी महत्वाचा प्रकल्प. (कृषि विभाग)

महाराष्ट्र कृषि- कृत्रिम बुद्धिमत्ता महाग्री-एआय (चरहर-सीळ--ख) धोरण २०२५-२०२९ मंजूर. कृषि क्षेत्रातील कृत्रिम बुद्धिमत्ता आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानाचा वापर करून परिवर्तन घडविता येणार. कृत्रिम बुद्धीमत्ता, निर्मितीक्षम कृत्रिम बुद्धीमत्ता, इंटरनेट ऑफ थिंग्ज, ड्रोन, संगणकीय दृष्टीक्षमता, रोबोटिक्स, पूर्वानुमान विश्लेषण यांचा वापर करत, राज्यातील ग्रीस्टॅक, महा-ग्रीस्टेक, महावेद, क्रॉपसॅप, गमार्कनेट, डिजिटल शेतीशाळा, महा-डिबीटी यांसारखे प्रकल्प पुढे नेण्यास मदत होणार. (कृषि विभाग)

मुंबई मेट्रो मार्ग-२अ, २ ब आणि ७ या मेट्रो प्रकल्पांकरिता एशियन डेव्हलपमेंट बँक व न्यू डेव्हलपमेंट बँक यांच्याकडून घेण्यात येणाऱ्या कर्जास मुदतवाढ. (नगरविकास विभाग)

विरार-अलिबाग बहुउद्देशीय वाहतूक मार्गिका प्रकल्प आता बांधा, वापरा आणि हस्तांतरित करा या तत्त्वावर हाती घेण्यास मान्यता. (सार्वजनिक बांधकाम विभाग).

आणीबाणीत कारावास भोगलेल्यांच्या मानधनात दुप्पटीने वाढ. हयात जोडीदारालाही मानधन मिळणार. गौरव योजनेमध्ये सुधारणा. (सामान्य प्रशासन विभाग).

अनिवासी भारतीयांच्या मुलांना, पाल्यांना व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश मिळणार. विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्थेतील अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी अनिवासी भारतीयांच्या व्याख्येत बदल. प्रवेश व शुल्क यांचे विनियमन अधिनियम, २०१५ मध्ये सुधारणा. (उच्च व तंत्र शिक्षण विभाग)



# गोरी गावात विद्यार्थ्यांना गणवेश वाटप

शहागड ।प्रतिनिधी

आज जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गोरी केंद्र शहागड तालुका अंबड जिल्हा जालना येथे शैक्षणिक वर्ष २०२५ २६ या वर्षातील पहिल्या दिवशी इयत्ता पहिलीतील प्रवेश पात्र मुलांचा प्रवेशोत्सव अतिशय आनंदात आणि उत्साहात साजरा करण्यात आला प्रवेश पात्र मुलांची पुष्पगुच्छ देऊन उत्साहात स्वागत करण्यात आले

व शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना पहिल्या दिवशी गणेश व पुस्तक वाटप करण्यात आले या कार्यक्रमासाठी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष नीता पवार उपाध्यक्ष भाऊसाहेब तीळवणे सर्व सदस्य व पालक गावकरी मंडळी व सामाजिक कार्यकर्ते मस्के साहेब मुख्याध्यापक मेढे सर व शिक्षक उपस्थित होते सर्व मुलांना गोड जेवण देऊन कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला

# साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्ती योजनेसाठी अर्ज दाखल करण्याचे आवाहन

बीड ।प्रतिनिधी

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्ती योजनेसाठी पात्र विद्यार्थ्यांनी अर्ज करावे असे आवाहन करण्यात आले आहे. अर्ज करण्याची अंतिम मुदत १८ जुलै २०२५, ही आहे. सन २०२४-२०२५ या शैक्षणिक वर्षात १० वी, १२ वी, पदवी, पदव्युत्तर, वैदकीय, व अभियांत्रिकी इत्यादी अभ्यासक्रमामध्ये विद्यार्थ्यांना सरासरी ६०% किंवा त्यापेक्षा जास्त टक्केवारी गुण प्राप्त झाले असतील, अशा उत्तीर्ण झालेल्या मातंग समाज व तत्सम १२ पोटजातीतील विद्यार्थ्यास, विद्यार्थीनीना महामंडळ कडून जेष्ठता व जास्त गुण क्रमांकानुसार विद्यार्थ्यास उपलब्ध निधीच्या अधीन राहुन साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते. त्यामुळे दि. १८ जुलै २०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत संपूर्ण कागदपत्रासह मातंग समाज व तत्सम १२ पोटजातीतील विद्यार्थ्यास, विद्यार्थीनीने जिल्हा कार्यालयाला संपर्क करावा.

उशिरा आलेल्या कागदपत्र अर्जाचा जिल्हा कार्यालयामार्फत स्विकार करण्यात येणार नाही, असे कळविण्यात आले आहे.पुढीलप्रमाणे मुळ कागदपत्रे दोन प्रतीसहित आणावीत.मार्कशीट अर्थात गुण प्रमाणपत्र, शाळा सोडल्याचा दाखला, रेशन कार्ड, जातीचा दाखला, उत्पनाचा दाखला, आधारकार्ड, दोन फोटो, पुढच्या वर्गात प्रवेश घेतल्याची पावती किंवा बोनाफाईड सर्टिफिकेटसह व जिल्हा व्यवस्थापकांच्या नावे शिष्यवृत्ती मागणीचा अर्ज कागदपत्रासह कार्यालयात आणून दाखल करावा, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक प्रणिता बोराडे-सरपते यांनी केले आहे.

जिल्हा कार्यालयाचा पत्ताः- साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.), बीड डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन शासकिय विश्रामगृह समोर बीड फोन - ०२४४२-२२४९१६

# बीड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदी जितीन रहमान यांची नियुक्ती

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणुन वर्धा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांच्या नियुक्तीचे आदेश मंगळवार दिनांक १७ जून २०२५ रोजी निर्गमित करण्यात आले आहेत.बीड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी एम. मुरुंगानथम यांच्या दिनांक १० जून २०२५ चे आदर्श रद्द करून जितिन रहेमान (भाप्रसे) यांची नियुक्ती करण्यात आली आहे.अप्पर मुख्य सचिव (सेवा) राधा यांनी दिनांक १७ जून २०२५ आदेशात नमूद केले आहे.

# सेवानिवृत्ती नंतरचे आयुष्य सामाजिक उन्नतीसाठी खर्च करावे - मंगलाताई खांडेकर



बीड ।प्रतिनिधी

शासकीय अथवा निमशासकीय सेवेतून सेवानिवृत्त होणाऱ्या प्रत्येक कर्मचाऱ्यांनी नंतरचे आयुष्यात समाजाच्या उन्नतीसाठी, प्रगतीसाठी आणि सामाजिक कार्यासाठी खर्च करावे असे आवाहन बडे बाबा शिक्षण संस्थेच्या सचिव श्रीमती मंगलाताई खांडेकर मॅडम यांनी श्री नारद स्वामी विद्या मंदिर या शाळेतील सेवक नितीन दादा वाघमारे यांच्या सेवानिवृत्ती निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानावरून बोलताना केले. यावेळी व्यासपीठावर युवा संचालक श्री प्रसाद संपतराव खांडेकर, शाळेचे मुख्याध्यापक श्री पाखरे सर, लहूजी शक्तीसेना(अध्यक्ष मराठवाडा) विजय चांदणे, जेष्ठ शिक्षक कागदेसर, सिरसट सर, दाबेकर मॅडम, जाधव, राठोड, सेवक इतापे आदी कर्मचारी उपस्थित होते.बीड शहरातील नवीन मोंढा मंदिर एम. आय. डी. रोड परिसरात असलेल्या श्री नारद स्वामी विद्या मंदिर या शाळेतील सेवक नितीन दादा वाघमारे हे नुकतेच नियत वयोमानुसार सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांच्या सेवानिवृत्ती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्थेच्या सचिव श्रीमती मंगलाताई खांडेकर मॅडम या होत्या. या वेळी नितीन दादा वाघमारे यांच्या विषयी मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमास श्री नारदस्वामी विद्यालयातील विद्यार्थी, विद्यार्थीनी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी शिक्षण प्रेमी नागरिक पालक मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.